
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक ७ / जुलै २०२५

## संपादकीय

### जिल्हा परिषद शाळेचा सन्मान

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक मुलाला शालेय शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे. ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाला शालेय शिक्षण अनिवार्य करण्यात आलेले आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी देशभर मोठ्या संख्येने शाळा काढण्यात आलेल्या आहेत. यातील काही शाळा खाजगी असून काही शासकीय आहेत. खाजगी शाळांमध्ये विनाअनुदानित आणि अनुदानित असे दोन प्रकार पडतात. याखेरीज स्थानिक स्वराज्य संस्था देखील काही शाळा चालवते. नागरी भागातील विद्यार्थ्यांसाठी नगरपालिका तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद शाळा चालवते. ज्या कुटुंबाची आर्थिक बाजू कमकुवत आहे अशीच मुले या शाळांमध्ये जातात. यातील बहुतांश शाळांची इमारत मोडकळीला आलेली असते. तसेच या शाळांमध्ये सुविधा देखील तुटपुंज्या असतात. या शाळांमध्ये शिकविण्यासाठी चांगला पगार देऊन शिक्षक नेमलेले असतात. परंतु शाळांमधील घटती पटसंख्या पाहून ते देखील निराश होतात. अशा परिस्थितीत एखाद्या जिल्हा परिषद शाळेचा जागतिक उत्तम शाळांमध्ये समावेश होणे ही एक अनपेक्षित घटना आहे. हा पराक्रम केला आहे जालिंदर नगरच्या जिल्हा परिषद शाळेने.

जालिंदर नगर हे गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात वसलेले आहे. या गावातील जिल्हा परिषद शाळेत जेव्हा श्री दत्तात्रय वारे रूजू झाले तेव्हा ही शाळा बंद पडण्याच्या मार्गावर होती. शाळेत फक्त ३ मुले होती. पहिल्याच वर्षी वारे गुरूजींनी ही पटसंख्या १२० वर नेऊन दाखविली. 'सरकार शाळेचा विकास करेल' अशी अपेक्षा ठेवण्याऐवजी शाळेचा 'विकास आपणच केला पाहिजे' असा निर्धार करून वारे गुरूजी कामाला लागले. या कामात त्यांना गावातील लोकांची खूप मदत झाली. शाळेचा कायापालट करण्याचा त्यांनी निर्धार केला. शाळेचा परिसर स्वच्छ केला. शिकविण्याच्या पद्धती बदलल्या. याचा परिणाम असा झाला की, ही शाळा "मुख्यमंत्री माझी शाळा-उत्तम शाळा" या स्पर्धेत ती 'उत्तम शाळा' म्हणून निवडली गेली. टी ४ एज्युकेशन (T 4 Education) या आंतरराष्ट्रीय संस्थेने आयोजित केलेल्या "वर्ल्डस् बेस्ट स्कूल्स २०२५ (World's Best Schools 2025)" या स्पर्धेत या शाळेचा पहिल्या १० उत्तम शाळांमध्ये समावेश झालेला आहे.

करोना महामारीने जगाची घडीच विस्कळीत करून टाकली. उद्योगधंदे, व्यापार उदीम, दळणवळण या सर्वांवरच या महामारीचा परिणाम झाला. शैक्षणिक संस्थांवर या माहामारीचा मोठाच परिणाम झाला. काही शिक्षण संस्थांनी दूरस्थ

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पूर्णपणे यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही. महामारीच्या नंतर शैक्षणिक संस्था मूळ पदावर आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आले. त्यातील टी ४ एज्युकेशन संस्थेची स्थापना हा एक स्तुत्य प्रयत्न आहे. आंतराष्ट्रीय स्तरावर शालेय शिक्षण क्षेत्राला उजाळा देण्याच्या उद्देशाने श्री विकास पोटा नावाच्या माणसाने 'टी ४ एज्युकेशन' नावाची एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन केली. जगभरातील शिक्षकांना एकत्र आणून शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. सर्व विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. आजच्या घडीला या प्लॅटफॉर्मशी १०० देशांतील शिक्षक जोडले गेले आहेत. ते आपले अनुभव प्लॅटफॉर्मवर लिहित असतात. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या परिस्थितीत काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये विचारांची आणि अनुभवाची देवाणघेवाण होऊ लागली. त्याचबरोबर त्यांना येणाऱ्या अडचणींचे देखील निराकरण करून घेण्यासाठी या प्लॅटफॉर्मचा उपयोग होऊ लागला.

'टी ४ एज्युकेशन' या संघटनेच्या वतीने जागतिक स्तरावर उत्तम काम करणाऱ्या शाळांची निवड केली जाते. यात ५ गट पाडले जातात :


१. समाजाचा सहभाग
(Community Collaboration)
२. परिसरातील कार्य
(Environmental Action)
३. नावीन्यपूर्ण कार्य (Innovation)
४. प्रतिकुलतेवर मात
(Overcoming Adversity)
५. निरोगी आयुष्याला हातभार
(Supporting Healthy Life).

२०२५ च्या स्पर्धेची सुरुवात २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात झाली. मार्च २०२५ पर्यंत अर्ज करण्याची मुदत होती. आलेल्या अर्जांची छाननी करून जून २०२५ मध्ये प्रत्येक गटात उत्तम ठरलेल्या १० शाळांची निवड जाहीर करण्यात आली. यातील पहिल्या गटात म्हणजे 'समाजाचा सहभाग' या गटात जालिंदर नगर मधील जिल्हा परिषद शाळेचा समावेश झालेला आहे. उत्तम शाळा निवड करण्याचे आणखी काही निकष लावून प्रत्येक गटातील एका शाळेचे नाव ऑक्टोबर महिन्यात जाहीर केले जाईल.

श्री दत्तात्रेय वारे गुरूजींनी जिल्हा परिषद शाळेचा स्तर उंचावण्यासाठी केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. समाजाचा सहभाग घेऊन शिक्षण व्यवस्था सुधारता येते हे त्यांनी दाखवून दिले. नाहीतरी आपल्या देशात शालेय शिक्षण ही समाजाचीच जबाबदारी मानलेली आहे. पूर्वीच्या काळी समाजाच्या मदतीने आपल्या देशात 'आश्रम शाळा' चालविल्या जायच्या. त्यानंतर गावोगावी मंदिरात किंवा घराच्या पडवीत शाळा भरू लागल्या. गावातील लोक प्राथमिक शिक्षकाला हरप्रकारे मदत करीत असत. तसेच त्याच्याकडे हक्काने सल्ला मागायला देखील जात असत. ब्रिटिश अमदानीत शिक्षणात औपचारिकपणा आला. दळणवळणाची सोय झाल्याने शिक्षक शहरात राहून गावातील शाळेत शिकवायला येऊ लागले. त्यामुळे गावातील त्यांचा संपर्क कमी झाला. त्यातच खाजगी शाळांचे पेव फुटले. विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळा मोठ्या प्रमाणावर निघाल्या. त्यामुळे सरकारी शाळांकडे दुर्लक्ष होऊ लागले. अनेक सरकारी शाळा पुरेशी पटसंख्या नसल्याने बंद कराव्या लागल्या. हे चित्र बदलता येते हे वारे गुरूजींनी दाखवून दिले. त्यासाठी त्यांचे अभिनंदन. इतर सरकारी शाळांमधील शिक्षक त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेतील अशी आशा आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●




व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ७/जुलै २०२५



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक १ ला)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | नर्मदा मॅन | श्री. दिलीप नारायण वंडलकर | ३ |
| ३) | टोकदार तत्त्वज्ञ! : बर्ट्रांड रसेल | श्री. अजिंक्य कुलकर्णी | ५ |
| ४) | कविता समजून घ्यायचा एक प्रयत्न... | डॉ. आनंद कुलकर्णी | ९ |
| ५) | आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर | श्री. चन्द्रशेखर टिळक | ११ |
| ६) | उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १४ |
| ७) | 'A La Carte अलास्का' | डॉ. जयश्री पवार | २२ |
| ८) | आपली वनसंपदा | डॉ. राजाभाऊ ढेपे | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# नर्मदा मॅन

*जगात 'जावा मॅन' आणि 'पेकिंग मॅन' म्हणून ज्ञात असलेल्या मानवी जीवाश्मांचे अस्तित्व अनुक्रमे जावा आणि चीन या राष्ट्रात उपलब्ध झाले होते. परंतु १९८२ साली प्रथमच 'नर्मदा मॅन' च्या जीवाश्मामुळे त्या काळची उपलब्धी भारतातही होती, हे सप्रमाण सिद्ध झाले. यामुळे मानवी उत्क्रांतीचे दक्षिण आशियातील एक नवे दालन अभ्यासासाठी उघडले गेले. त्याचाच वृत्तान्त प्रस्तुत लेखात मांडण्यात आला आहे. – संपादक*

मानवी संस्कृतीचा उगम आणि विकास नद्यांच्या साथीने त्यांच्याच सानिध्यात झाला. स्थानिक इतिहास, संस्कृती, प्रकृती, पर्यावरण, भूगोल, सण-सभारंभ, भाषा, उद्योग, शेती इत्यादी अंगांनी भवताल जाणून घेण्यासाठी नदीला जाणून घेणे गरजेचे असते.

अशीच एक नदी.. नांव तिचे नर्मदा..! तिला 'रेवा' अशा दुसऱ्या नांवानेही संबोधल्या जाते. भारतातील सात पवित्र नद्यांपैकी एक. ती मैफल पर्वत राजीतील अमरकंटक येथे उगम पावून गुजराथेतील भडोचजवळ अरबी समुद्रात विलीन होईपर्यंतचा तिचा प्रवास थक्क करणारा आहे. तिच्या काठाकाठाने परिक्रमा करणाऱ्यांना तर अनेक गूढ अनुभव येत असतात. विंध्य आणि सातपुडा या मध्य भारताच्या पर्वतमालांना विभागणाऱ्या घळीतून वाटचाल करणाऱ्या या सरितेनं अश्म काळातील दक्षिण आशिया खंडातील मानवाचे पृथ्वीवर असणे सुसह्य केलं आहे.

या नदीचं जबलपूर ते होशंगाबाद हा सुमारे ४३० कि. मी. लांबीचा पट्टा अंदाजे २५० मीटर जाडीच्या वाळूच्या खडकांनी व्यापला आहे. या पैकी सर्वांत खालचा तळ हा सात लाख B.C., तर वरचा सुपिक हा पंचाहत्तर B.C. वर्षांपूर्वीचा आहे. या थरांनी अनेक अश्मयुगीन काळातील मानवी वसाहतींना आश्रय दिल्याचे त्यांनी वापरलेल्या वस्तू, हत्यारे व पृष्ठवंशीय जीवाश्मांच्या अभ्यासातून समोर येते.

सध्या नर्मदेचे नांव चर्चेत असते, ते तिच्या काठावर सापडलेल्या मानवी जीवाश्माच्या अनुषंगाने. तसं बघितलं तर या जीवाश्माचा शोध अपघाताने लागला असेच म्हणावे लागेल. तो दिवस होता ५ डिसेंबर १९८२ चा. नर्मदेच्या तीरी होशंगाबादपासून वायव्येस ३५ कि. मी. अंतरावरील हाथनोरा (जिल्हा – सिहोर) या गावी जिऑलॉजीकल सोसायटी ऑफ इंडियाचे भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. अरुण सोनकिया कामानिमित्त पायी भटकत असताना कशाला तरी ठेचकाळले. खाली वाकून त्यांनी ह्या ठेचकाळलेल्या दगडाला उचलले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्या चाणाक्षनजरेने तो मानवी कवटीचा जीवाश्म असल्याचे हेरले. नंतरच्या एकात्मिक निरीक्षणातून तो लोअर पॅलिओलिथीक काळातील असल्याचे ज्ञात झाले. या आधी अश्मयुगीन मानवाने शिकारीसाठी वापरलेली हत्यारे, विविध मृद भांडी, अनेक रंगांचे खडे आदी वस्तू या परिसरात दिसून आल्या होत्या. इथे अश्मकालीन मानवी वसाहत होती; परंतु त्याचे पुरावे कांही केल्या सापडत नव्हते. त्याची पूर्तता या घटनेने करून दिली. या मानवी जीवाश्माचे नामकरण 'नर्मदा मॅन' म्हणून करण्यात आले.



**'नर्मदा मॅन' चे जीवाश्म**

जो सतत काही काम करीत राहतो तोच नेहमी उत्साही राहतो.

जगात याआधी 'जावा मॅन' तसेच 'पेंकिंग मॅन' म्हणून ज्ञात असलेल्या मानवी जिवाश्मांचे अस्तित्त्व अनुक्रमे जावा आणि चीन या देशांत उपलब्ध झाले. आफ्रिकेतसुद्धा मानवी हाडे, त्यांनी तयार केलेली हत्यारे व इतर चिजवस्तू सहजपणे सापडल्या होत्या. मात्र १९८२ साली पहिल्यांदाच 'नर्मदा मॅन' च्या रुपाने त्या काळची मानवी उपलब्धी भारतातही होती, हे सप्रमाण सिद्ध झाले, असे मानववंशशास्त्रज्ञ (Anthropology) विभाग, दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. डी. के. भट्टाचार्य म्हणतात.

या घटनेमुळे मानवी उत्क्रांतीचे दक्षिण आशियातील अभ्यासासाठी एक नवे दालन उघडले गेले. मॅग्नेटिक पॅलिओ डेटिंग प्रणाली, तसेच आजूबाजूच्या दगडधोंडे व इतर जीवाश्मांच्या वरवरच्या साम्यातून 'नर्मदा मॅन' चे आयुष्य ५ ते ६ लाख वर्षांपूर्वीचे असावे आणि हा मानव २५ ते ३० वर्षांदरम्यानचा असावा, असे डॉ. अरुण सोनकिया म्हणतात. हा मानव स्त्री की पुरुष हे गूढ नंतर उकलण्यात आलं. कारण होतं भारतीयांचं या विषयी असणारं तोकडं ज्ञान.


असो. चुकून हाती लागलेल्या 'नर्मदा मॅन' च्या शोधानंतर भूगर्भ विभागाद्वारे पुढे सतत १० वर्षे म्हणजे १९९२ पर्यंत हाथनोरा परिसरात काळजीपूर्वक उत्खनन करण्यात आले. त्यातून अनेक अश्मयुगीन हत्यारे व नर्मदा मॅनच्या उजव्या कॉलर बोनचा जीवाश्म हाती लागला. यावेळी अभ्यासासाठी देश-विदेशातील अनेक तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. त्यांनी अभ्यासाअंती 'नर्मदा मॅन' चार जीवाश्म हा २५ ते ३० वर्षे असलेल्या तरुण स्त्रीचा असून, ती बुटकी असली तरी तिचा कणा चांगलाच धष्टपुष्ट होता, हे स्पष्ट केले. तसेच ती आफ्रिकन होमो इरेक्टस् वा युरोपियन निआन्डरलेन्सिस पेक्षा वेगळ्याच घाटणीची असल्याचे समोर आले. १९८८ साली या कवटीचा परत एकदा फ्रांस देशातील मार्सेली गावी स्थित 'Human Palaentology and Prehistory Laboratory' त अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातून तेथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ.डी. लुमीली यांनी या जीवाश्माचे गुणधर्म दक्षिण - पूर्व आशिया, चीन व आफ्रिका या देशांतील होमो इरेक्टसशी बरेचसे साम्य दाखवत असले तरी कांही बाबतीत ते भिन्न असल्याचे कथन केले. उदा. आद्य आणि मधल्या प्लिस्टोसिन काळातील अशा जीवाश्मांच्या कवटीची क्षमता १००० घन सें. मी. असते, तर नर्मदा मॅनच्या कवटीची क्षमता ११५५ ते १४२१ घन सें. मी. असल्याचे आढळून आल्याने त्यांनी नर्मदा मॅनचे वर्गीकरण 'Evolved Homo erectus' असे केले. ही अवस्था उत्क्रांतीच्या टप्प्यातील 'Homo Heidelbergensis' शी मिळतीजुळती आहे, असे मतही त्यांनी मांडले. याचीच री केन्नेथ एक. आर. केन्नेडी, कॉर्नेल विद्यापीठ , अमेरिका यांनी ओढली. त्यांच्या मतानुसार 'नर्मदा मॅन' चे गुणधर्म ४३ टक्के होमो इरेक्टसशी मिळतेजुळते असले तरी हा पूर्णपणे विकसित झालेला नसल्याने त्याचे वर्गीकरण 'Not evolved होमोसेपियन वा' 'Archaic Homo Sepien' असे सुचवले. इतरांनी त्याची बाजू उचलून धरली आणि नर्मदा मॅनचे वर्गीकरण 'Archiac Homo Sepien' असे करण्यात आले. (संदर्भ - सांख्यन १९९७, १९९९)

शरीरशास्त्रदृटच्या आधुनिक मानवाचा उगम आफ्रिकेत सुमारे दोन लाख वर्षांपूर्वी होऊन त्याचा भारतीय उपखंडात दोनदा प्रवेश झाला. पहिला प्रवेश १३५००० ते ११५००० हजार वर्षांपूर्वी झाला. त्यातील बहुतांश मरण पावलेत आणि जे उरलेत ते परत गेले. त्यांचा दुसऱ्यांदाचा प्रवेश ७०००० ते ६९००० हजार वर्षांपूर्वी म्हणजे टोबो या इंडोनेशियातील ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर झाला. या उद्रेकामुळे २८०० घन कि. मी. मॅग्मा बाहेर फेकल्या गेल्या तर २८०० मिलियन टन

(पृष्ठ क्र. ८ वर)

# टोकदार तत्त्वज्ञ! : बर्ट्रांड रसेल

*१८मे २०२५ रोजी थोर ब्रिटिश तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यांची शतकोत्तर सुवर्ण (१५० वी) जयंती. त्यांच्या कार्याविषयीचा धावता आढावा घेणारा लेख. – संपादक*



बर्ट्रांड रसेलचे रसेल हे घराणे इंग्लंडमधील एक सुप्रसिद्ध अशा खानदानी घराण्यांपैकी एक आहे. या रसेल घराण्याने इंग्लंडला कित्येक मुत्सद्दी पुरवले. बर्ट्रांड रसेल यांचे आजोबा लॉर्ड रसेल हे लिबरल पक्षातर्फे इंग्लंडचे पंतप्रधान होऊन गेलेले आहेत. बर्ट्रांड रसेल यांचे वडील एक मुक्त चिंतक होते. त्यांनी आपल्या मुलांवर पाश्चिमात्य वंशपरंपरेने आलेल्या ईश्वरशास्त्राचा बोजा लादला नाही. बर्ट्रांड रसेल वंशपरंपरा नाकारतात, म्हणूनच रसेल यांनी आपल्या नावामागे कधीही 'लॉर्ड' हे नामाभिधान लावले नाही. महायुद्धाच्या विरोधात स्पष्ट, रोखठोक भूमिका घेतल्यामुळे त्यांची केंब्रिज मधून हकालपट्टी करण्यात आली. युद्ध विरोधामुळे रसेलला आपल्याच मायदेशी इंग्लंडात सामान्यांपासून ते राजकारणी, विचारवंतांपर्यंत सर्वांच्याच रोषाला सामोरे जावे लागले होते. तर्कशास्त्राच्या गुणांवर त्यांनी फार जोर दिला होता. गणिताला त्यांनी आपला देव मानलं होतं. 'माझ्याविषयी विचाराल तर गणिता शिवाय मला दुसरा देव नाही' असं ते म्हणत. विचार स्पष्ट आणि स्वच्छ असावेत म्हणून तर ते गणिताकडे वळले होते. एकोणिसाव्या शतकातील सर्वोत्कृष्ट गोष्ट कोणती असा प्रश्न विचारला असता ते निसंदेहपणे 'गणितातील प्रगती' असं सांगत. या गणित व तर्कशास्त्राच्या ओझ्याखाली रसेल जे पूरले गेले होते, गप्प बसलेले होते ते अचानक उठले, जागे झाले, मुक्त ज्वालेप्रमाणे पेटले; जेव्हा युरोपात महायुद्धाचा मूर्खपणा सुरू झाला होता. तेव्हा हा हाडकुळा, मरतुकडा प्राध्यापक असीम धैर्यशील आहे, मानव जातीचा उत्कट प्रेमी आहे ही गोष्ट जगाला कळली व जग चकित होऊन त्यांच्याकडे पाहू लागले होते. आपल्या तर्ककठोर चिंतनातून आलेल्या विचारांच्या पायावर त्यांनी युद्ध विरोधासाठी आपल्याच देशातील उच्चपदस्थ लोकांवर टीकेची झोड उठवली होती. वेळीच लेखणीला वेसण घातले नाही तर विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल या धमकीलाही त्यांनी भीक घातली नाही. गॅलिलिओ प्रमाणे त्यांनाही इंग्लंडमधील तुरुंगात डांबण्यात आले होते. रसेलच्या विचारांविषयी ज्यांना शंका होती त्यांना त्यांच्या कळकळी विषयी मात्र शंका नव्हती. तर ते त्यांनी अचानकपणे घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे गडबडले होते.

''मानवी जीवनातील परमोच्च गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे स्वातंत्र्य. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तिमत्त्व अशक्य असतं. जीवन आणि ज्ञान आज इतकी गुंतागुंतीची झाली आहेत की, मोकळ्या चर्चेनेच सर्वांगीण दृष्टी आपल्याला प्राप्त होऊ शकते. खुल्या मार्गाने चर्चा केल्याशिवाय पूर्वग्रह व चुका यातून मार्ग तरी कसा सापडणार? खुला विचार व चर्चा सर्वत्र व्हायला पाहिजे.

स्वतःबद्दलचा दृढ आत्मविश्वास आणि हसरा चेहरा हे स्मार्टनेसचे प्रतीक आहे.

माणसे, शिक्षक, प्राध्यापक सर्वांना चर्चा करू देत. झाले तर होऊ देत मतभेद'' असं रसेल म्हणत असे. आपल्या शाळा व आपली विद्यापीठे यांची जर योग्य रीतीने वाढ करू, योग्य माणसे तेथे नेमू, मानवी स्वभावाची पुनर्रचना करण्याचे काम जर बुद्धीपूर्वक हाती घेऊ, तर मानव काय करू शकणार नाही ? आपण सगळं काही करू शकतो असा आशावाद त्याच्याठायी असायचा. उदार तत्त्वज्ञानातील एक मूलभूत गोष्ट म्हणजे मुद्रण-भाषण - स्वातंत्र्य. रशियात या गोष्टींना स्थान नाही हे पाहून रसेल रागावले होते. रशियात पद्धतशीरपणे प्रचाराचे प्रत्येक स्थान कसे ताब्यात घेण्यात आले आहे हे पाहून ते इतके रागावले की, रशियात निरक्षरता आहे हे पाहून रसेलला आनंदच झाला. ते म्हणाले की, 'ज्या काळात वर्तमानपत्रे सरकारी मदतीने चालतात अशा काळात वाचता येणे म्हणजे सत्यप्राप्तीच्या मार्गातील मोठी धोंडच म्हणायची.' रसेल म्हणजे अनेक बाबतीत नुसते वैपुल्य आहे. रसेलला १९५० साली साहित्याचे नोबेल मिळाले होते. नोबेल समितीने पुरस्काराच्या मानपत्रात म्हटलं होतं की, 'रसेल हे बहुश्रुत आहे. त्यांचे सगळ्यात महत्त्वाचे काम जर कोणते असेल तर ते सतत विचारस्वातंत्र्य आणि मानवतेच्या बाजूने उभे राहिले.'

खरंतर ज्यांचा देवावर वगैरे विश्वास नसतो त्यांनी देवावर श्रद्धा असणाऱ्यासोबत वाद घालण्यात अर्थ नसतो. परंतु अनेक कट्टर नास्तिक, ठाम विज्ञानवादी आणि स्केप्टिक उर्फ शंका/संशयवादी 'देव नाहीच' हे सिद्ध करू पाहत असतात. फारच थोडे आस्तिक हे विचाराने नास्तिक झालेले आहेत. पंडित नेहरू हे विचाराने नास्तिक होते, वृत्तीने व व्यवहाराने शंभर टक्के विज्ञानवादी होते; पण स्वभावाने सहिष्णू व उदारमतवादी असल्याने त्यांनी देववाद्यांची टिंगल-टवाळी केली नाही व त्यांच्या तोंडीही ते कधी लागले नाहीत. बर्ट्रांड रसेल शंकावादी म्हणजेच स्केप्टिक होते आणि देवाच्या मुद्यावर ते 'ॲग्नॉस्टिक' उर्फ अज्ञेयवादी होते. 'एथिइस्ट' म्हणजे निरीश्वरवादी नव्हते. त्यांनी तर 'मी ख्रिश्चन का नाही' (व्हाय आय एम नॉट अ ख्रिश्चन) या विषयावर प्रबंधरूपी पुस्तिका लिहून इंग्लडमध्ये एकच खळबळ माजवली होती; पण रसेल यांनीच 'मी कम्युनिस्ट का नाही'(व्हाय आय एम नॉट अ कम्युनिस्ट) अशीही पुस्तिका लिहून डाव्या मंडळींमध्ये एक सुरुंग पेरला होता. त्यामुळे रसेल असोत वा नेहरू; या दोघांबद्दलही बोलताना कम्युनिस्ट मंडळी कधी बुद्धिवादी अहंतेने, तर कधी तुच्छतेने बोलतात. पण गंमत म्हणजे जेव्हा ईश्वरवाद्यांशी वाद घालण्याचा प्रसंग येतो तेव्हा मात्र ते रसेल यांच्याच तर्कवादी मांडणीचा आधार घेतात. 'मॅरेज अँड मॉरल्स' या आपल्या पुस्तकात बर्ट्रांड रसेल स्पष्टपणे म्हणतात की, 'ख्रिश्चन समाजाची रचना ही पूर्वेकडील आशिया, तुर्कस्थान या जुन्या समाजांप्रमाणे जीवशास्त्रीय पद्धतीने करणे शक्य नाही. तसेच कामशास्त्र हा विषय 'विषय' म्हणून सर्वच धर्मांनी दाबल्याचे आपल्याला दिसून येते.' रसेल आपल्या 'इंट्रोडक्शन टू सेक्स इन सिव्हिलायझेशन' या पुस्तकात म्हणतात की, ''विद्यापीठांमध्ये समाजशास्त्र या विभागात फक्त एखाद्याच विषयाचा अभ्यास करून चालणार नाही. एखाद्या गावात जाऊन काही आकडे गोळा केले आणि त्याची सांखिकी मांडून एक महानिबंध लिहिणे म्हणजे समाजशास्त्र नव्हे. कामशास्त्र, सुप्रजननशास्त्र, उत्क्रांती, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र या सर्वांचं मिळून 'समाजशास्त्र' उभं राहतं.'' पण कामविकारालाही पवित्र मानणाऱ्या, तसेच गीतेत 'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ'(गीता ७/११) असं स्पष्टपणे म्हटलेलं असतानाही आमच्या भारतीय समाजाने मात्र 'कामा'ला टॅबू ठरवलं.

रसेल यांच्या जीवनात त्यांनी घेतलेल्या भूमिका किंवा केलेली अनेक विधाने ही वादग्रस्त ठरली. वादग्रस्त होण्याचे महत्त्वाचे कारण त्यांनीच एकदा सांगितले होते.

---

मरणाचे नेहमी स्मरण ठेवा पण मरणाची इच्छा बाळगू नका.

'माय मेंटल लाईफ वॉज पर्पेच्युअल बॅटल' या त्याच्या उद्गारातून यामागचे कारण आपण समजू शकतो. रसेल यांची मते व भूमिका ह्या अनेकदा बदलत गेल्या हे आता त्याच्या सर्व वाचकांना कळले आहे. विचारांचा व वृत्तीचा अखंड विकास हा रसेल यांना भूमिका सातत्यापेक्षा जास्त महत्त्वाचा वाटला आहे. रसेलवर इतरांनी टीका करण्यापेक्षा रसेल हे स्वतःच स्वतःचे सर्वांत मोठे टीकाकार राहिलेले आहेत. रसेल यांची 'न्यूयॉर्क सिटी कॉलेज' मध्ये तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली होती. ही नियुक्ती करताना कॉलेजच्या चालकांनी 'तुम्ही इथे रुजू झालात ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे' असे उद्गार काढले होते. रसेल तिथे तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, शुद्ध विज्ञानाचा तत्त्वमीमांसेशी असलेला संबंध हे विषय शिकवणार होते. झालं! या नियुक्ती विरुद्ध न्यू यॉर्कमध्ये, अमेरिकेत व जगात एकच वादळ उठले. वादळ उठवणाऱ्यांच्या तक्रारी जर अभ्यासल्या तर त्या किती अनाठायी होत्या हे लक्षात येते. अमेरिकेतील विविध ठिकाणचे बिशप, विविध वृत्तपत्रांच्या संपादकांनी रसेलवर टीकेची झोड उठवली. परंतु जॉन ड्युई सारखे एक जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ यांनी मात्र रसेल याची बाजू उचलून धरली. जॉन ड्युई, अल्बर्ट आइन्स्टाईन यांच्यासारख्या माणसांनी रसेल वर होणाऱ्या आरोपांबद्दल आपली प्रखर व जाहीर चीड व्यक्त केली. रसेल यांची नेमणूक गणित, तत्त्वज्ञान व विज्ञान हे विषय शिकविण्याकरिता होती. 'विज्ञान व गणित शिकवीत असताना मुद्दाम विषयांतर करून रसेल त्यांचे तथाकथित 'अनैतिक तत्त्वज्ञान' शिकविल, समलैंगिकतेचा प्रचार करेल' असे मूर्खपणाचे आरोप न्यू यॉर्क सारख्या जगप्रसिद्ध शहराने एका प्रचंड विद्वान् माणसावर करणे या प्रकाराने मन सुन्न होऊन जाते. महान व्यक्तींना या नरक यातना नेहमीच सहन कराव्या लागल्या आहेत. असे आइन्स्टाईन यांचे म्हणणे होते.

रसेल यांच्या मते 'शिक्षक हा सुसंस्कृतपणाचा आद्य रक्षक होय. सुसंस्कृतपणा म्हणजे या जगात आपल्या मातृभाषेचे, आपल्या देशाचे, आपल्या स्वतःचे काय स्थान आहे याचे भान असणे होय. सुसंस्कृतपणा आपल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हे शिक्षकाचे मुख्य कर्तव्य आहे' असे रसेलला वाटत असे. 'शिक्षकाने मुलांच्या मनातील मत बनवण्याची प्रक्रिया विवेकावर आधारित कशी राहील याची खबरदारी घ्यावी. राष्ट्राचे संरक्षण हे जेवढे सैन्यदलाच्या हातात असते तेवढेच ते शिक्षकांच्याही हातात असते' असे रसेल यांचे म्हणणे होते. जोपर्यंत शिक्षक मुळाक्षरे आणि पाढे यासारखे निरुपद्रवी विशेष शिकवत असतो आणि त्यातून कुठल्याही प्रकारचे वाद उद्भवण्याची शक्यता नसते तोपर्यंत त्याच्या भोवतालच्या अधिकृत हट्टाग्रहांचा त्याच्या शिकवण्यावर कुठलाही वेडावाकडा परिणाम होत नाही. पण एकछत्री राजवटीखालील राष्ट्रांमध्ये अगदी साधे-सरळ विषय शिकवताना सुद्धा शिक्षकाने त्याच्या दृष्टीने सर्वांत परिणामकारक पद्धत वापरणे अभिप्रेत नसते. वर्गात शिक्षकाने शिक्षक म्हणून सतत स्वतःचा अधिकार वापरावा, मुलांच्या मनात भीती, धाक, बोटचेपेपणा आणि आंधळा आज्ञाधारकपणा निर्माण करावा, अशी अपेक्षा असते. यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षकांची सत्ता निमूटपणे मान्य करावी, त्यास कधीही आव्हान देऊ नये, असेच संस्कार शिक्षकाने त्याच्यावर करावेत असा आग्रह धरला जातो. मूळाक्षरे आणि पाढे शिकवण्याचा टप्पा ओलांडून शिक्षक पुढे गेला रे गेला की, कुठल्याही वादग्रस्त मुद्द्यावर त्याने राज्यकर्त्यांचा अधिकृत दृष्टिकोनच स्वीकारायला हवा, अशी सक्ती होऊ लागते. या कारणामुळेच नाझी राजवटीतील जर्मन युवक वंश वर्ण याबाबत कमालीचे दुराग्रही बनले होते. रशियातही तेच झालं होतं. लोकशाही राष्ट्रांमध्ये दुराग्रहांचे प्रमाण तुलनेने कमी आहे, मात्र तिथे सुद्धा शिक्षण क्षेत्रात ते तसेच वाढत जाण्याचा गंभीर धोका आहे हे

मान्यच केले पाहिजे. हा धोका टाळायचा असेल तर वैचारिक स्वातंत्र्यावर विश्वास असणाऱ्यांनी शिक्षकांवर बौद्धिक गुलामगिरी लादली जाणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. ते करायचं असेल, तर सर्वात प्रथम शिक्षकांची समाजाप्रती कर्तव्य कोणती, याची सुस्पष्ट कल्पना असणे गरजेचे आहे. धर्मगुरूंनी रोज अमुक इतके तास प्रवचन केले पाहिजे अशी अपेक्षा त्यांच्याकडून कुणीही करत नाही; पण शिक्षकाने मात्र पाच-सहा तास दररोज शिकवलेच पाहिजे. याचा परिणाम असा होतो की, शिक्षक कंटाळून जातो. त्यांना शिकवण्याचा ताण वाटू लागतो. त्यांना जे विषय शिकवायचे असतात त्या विषयातील नवनवीन घडामोडींशी त्यांचा संपर्क रहात नाही. नवे ज्ञान, नवी समज यातून जो बौद्धिक आनंद मिळतो तो मिळवण्यासाठीची प्रेरणा ते आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करू शकत नाहीत.

अर्वाचीन काळातल्या तत्त्वज्ञांचा पट उलगडला असता प्रदीर्घ काळापर्यंत मानवी समाजाला उद्बोधन करीत राहणारे विचारवंत म्हणून बर्ट्रांड रसेल यांच्याकडे आपल्याला पहावे लागेल. ९८ वर्षांचे दीर्घ आयुष्य त्यांना लाभले होते. शिवाय शेवटपर्यंत त्यांची बौद्धिक व शारीरिक स्थिती उत्तम राहिली. दोन महायुद्धे, कित्येक देशांमधील क्रांत्या यांचे ते साक्षीदार होते. साक्षीदार हा कोणीही असू शकतो; पण रसेल यांनी मात्र या सर्व घटनांचे सामाजिक, राजकीय, वैचारिक पृथक्करण केले होते. त्या पृथक्करणातून बाहेर आलेलं चिंतन हे त्यांनी केवळ स्वतःपुरते मर्यादीत न ठेवता ते एका निरंतन स्रोताप्रमाणे समाजापुढे ठेवत गेले.

**- श्री. अजिंक्य कुलकर्णी**
मु./पो. - अस्तगांव, ता. - राहाता
जि. - अहमदनगर, पिन - ४२३१०७
मो:- ८२०८२१८३०८

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून - **नर्मदा मॅन**)

वायू वातावरणात पसरला. त्यामुळे जगभर ५ ते ६ इंच जाडीचा थर भुपृष्ठावर साचला. सूर्याची किरणे धुलिकणांमुळे झाकोळली जाऊन भयंकर शितयुगाची सुरुवात झाली. हे शितयुग शेकडो वर्षांचे असल्याने जीवसृष्टीच्या अनेक प्रजाती लुप्त झाल्या. ज्या जगल्या त्यात होमोसेपियन्सचाही समावेश होता.



LAKE TOBA

आता प्रश्न पडतो की, नर्मदा मॅन हा ७०००० वर्षांपूर्वीचा की १३५००० वर्षांपूर्वीचा? वा त्याही आधीचा? त्या करिता त्याचे वयोमान निश्चित करणे आवश्यक आहे. मात्र, आज ४३ वर्षे उलटूनही आपण नर्मदा मॅनचा जन्म केंव्हा झाला हे सिद्ध करू शकलो नाही.

असो. नर्मदा मॅनचा शोध लावून भारतास आफ्रिका, चीन, युरोप यांच्या पंक्तीत बसवणाऱ्या डॉ. अरुण सोनकिया यांचा मृत्यू दुर्दैवाने मे २०१८ साली एका अपघातात झाला. त्या महान आत्म्यास मानाचा त्रिवार मुजरा..!

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

●●●

# कविता समजून घ्यायचा एक प्रयत्न...

*इ इ कमिंग्स या अमेरिकन कवीच्या काव्यावर ज्येष्ठ समीक्षक डॉ आनंद कुलकर्णी यांचा लेख: संपादक*

E. E. Cummings's poetry is terse and cryptic. It is characterized by broken syntax, lower case letters, self-devised compound words and unusual punctuation. Read this poem.

silence
.is
a
looking
bird:the
turn
ing;edge,of
life
(inquiry before snow)



कशी वाटली ही E. E. Cummings ची कविता? अल्पाक्षरी, संक्षिप्त आणि संपृक्त. वर वर्णन केलंय तशी पारंपरिक फॉर्म आणि स्टाईलला थेट आव्हान देणारी कविता. कशी समजून घेणार आपण ही कविता? कविता सायलेन्स/ शांततेविषयी आहे. तशीच ती आवाजाविषयीही आहे. शांतता आणि आवाज यातलं नैसर्गिक काय आहे आणि मानवी/सांस्कृतिक काय आहे हे कळणं कठीण आहे. याशिवाय शांतता आणि आवाज यात विरोध आहे.

शांतता व्यक्त करता येत नाही, ती अनुभवावी लागते. कितीही शब्द वापरले तरी ती व्यक्त होत नाही. किती कमीतकमी शब्द वापरले म्हणजे तिच्याकडे निर्देश करता येतो हे ही कविता दाखवते. आणि केवळ निर्देश, निवेदन नाही, अर्थनिर्णयन नाही. ते वाचकानं स्वतः करायचं. जणू कवी अभिव्यक्तीच्या, भाषेच्या मर्यादा दाखवतोय. हे करताना कवितेत the looking bird अशी प्रतिमा येते. काय आहे ही प्रतिमा? आवाज नसणे किंवा आवाज अव्यक्त राहणे हे यातून सुचवलेलं आहे. कसं काय? बघा ना looking bird असा शब्दसमूह आहे. तुम्हाला तो वेगळा, खटकणारा वाटत नाही? singing bird हा परिचित आणि नेहमीच्या वापरातील शब्दसमूह आहे. पण इथे तर looking bird असा वापरलाय. तो singing bird ला सरळ छेद देणारा आहे. बघणारा पक्षी नाही तर 'गाणारा पक्षी' ही अधिक परिचित म्हणून योग्य प्रतिमा आहे. पक्षी गाणाराच असतो, बघणारा नसतो. पण गाणारा म्हणजे आवाज असलेला पक्षी. कविला तर आवाज नको आहे, शांतता हवी आहे. कविताच शांततेवरची आहे. म्हणून मग looking bird असा शब्दप्रयोग येतो. looking bird म्हणजे unsinging bird. न गाणारा, आवाज न करणारा पक्षी. looking bird हे या अर्थाने निगेशन आहे. अभावाची अवस्था आहे. आवाजाचा अभाव आहे.

दुसरी प्रतिमा आहे the turning edge of life. म्हणजे काय? अशी अवस्था जिथे आवाज संपतो.

स्पीचलेसनेस. अतिशय धोकादायक, मृत्यू समोर असलेली अवस्था. अशी अवस्था असेल तेव्हा आवाज काढणं, बोलणं केवळ अशक्य असेल. मग निव्वळ शांतता असेल. इथेही निगेशन आहे, आवाजाचा अभाव आहे. पण यातली गंमत ही की, looking bird आणि the turning edge of life यांची कधीही भेट होणार नाही. ते कधीही एकमेकांसमोर येणार नाहीत. दोन्हीतही आवाजाचा अभाव आहे, दोन्हीही शांत आहेत. पण या दोन्ही शांततांचा मिलाफ कधीच होणार नाही. कारण बघणारा पक्षी कधीच गाणार/बोलणार नाही आणि धोकादायक स्थितीत आवाज हरवलेली व्यक्ती कधीच बोलणार नाही. इथे प्रश्न हा आहे की, शांततेला व्यक्त व्हायची, बोलायची, आवाजी व्हायची गरज असते का? भाषिक दृष्टीने बोलायचं तर शांतता म्हणजे कोणत्याही क्रियापदाची गरज नसलेलं, स्वत:च एक संपूर्ण, स्वयंपूर्ण वाक्य आहे. शांतता कवितेतील पहिला शब्द silence च्या नंतर येणाऱ्या पूर्णविरामासारखी असते. या पूर्णविरामानंतर ळी हे क्रियापद येतं. क्रियापद म्हणजे action-expression. शांततेचं स्वयंपूर्ण वाक्य पूर्ण झाल्यानंतर आवाज येतो. शांतता व्यक्त झाल्याने पूर्ण होत नाही. म्हणजे पूर्णत्वासाठी व्यक्त होणं ही शांततेची निकड नसते. व्यक्त झाल्याने आवाज पूर्ण होतो, शांतता नाही. आवाजाला व्यक्त व्हावं लागतं. अशी दोन प्रतिमांमधून शांततेची भिन्न रूपे कविता वाचकांपुढे धरते. तोंडाने ज्या गोष्टींचा उच्चार करता येत नाही त्या looking लळीव सारख्या बघता येतात. आणि आवाजच हरवून जातो. अशा दुर्धर प्रसंगी शांत राहून बघत बसण्याशिवाय आपल्याकडे पर्याय नसतो. दोन्हीकडे बघणं आहे, बोलणं नाही. शांतता आहे, आवाज नाही.

Cummings ची कविता ऐकण्यासाठी नसते, वाचण्यासाठी असते. ती aural नसते, visual असते. म्हणजे कवितेत भाषेच्या, व्याकरणाच्या, विरामचिन्हांच्या स्वरूपात ज्या प्रकारचे बदल केलेले असतात ते बघायचे, वाचायचे असतात. पण या कवितेत तर शांततेचं आणि त्याआडून आवाजाचं सूचक वर्णन आहे. म्हणजे प्रत्यक्ष आवाजी न होता आवाजा विषयी सुचन येत रहातं. Aural- आवाजाशी संबंधित सगळं आहे पण आवाज नाही. कारण शांतता हा आशय आहे. हेच या कवितेचं बलस्थान आहे. इंद्रिय भावना आणि कृतींना नाकारताना त्यांनाच व्यक्त करणारी आशयघन, विचारगर्भ कविता!

(inquiry before snow हा कवितेच्या शेवटी येणारा शब्दसमूह लक्षात घेतला तर कवितेचा अर्थ संदर्भ असलेला, प्रसंगनिष्ठ होऊ शकतो)

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर

**लेखक : सुहास बहुलकर**

*एका संवेदनशील चित्रकार लेखक असणाऱ्या सुहास बहुलकर यांनी ख्यातनाम शिल्पकार करमरकर यांच्या कलात्मक ताकदीबद्दल, सहृदत्वाबद्दल स्वत:च्या विशिष्ट शब्दसामर्थ्यांनी लिहिलेले पुस्तक हे एक अनमोल ठेवा निश्चितच गणला जातो. – संपादक*

आज हे पुस्तक पुन्हा आवर्जून वाचण्याचे कारण म्हणजे अगदी अलीकडेच झालेले रतन टाटा यांचे निधन ! त्यांच्या निधनाने एकंदरीतच 'टाटा कार्यसंस्कृती' हा विषय सध्या चर्चेत आहे.

या पुस्तकात पान क्रमांक १२५-१२६-१२७ यावर टाटा समूहाची कार्यसंस्कृती विषद करणारा एक प्रसंग नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार जे. आर. डी. टाटा यांना काही कारणाने जमशेदजी टाटा यांचा एक पुतळा तयार करून हवा होता. तो पुतळा शिल्पकार करमरकर यांनी तयार केला. त्यावेळी घडलेल्या प्रसंगातून टाटा आणि शिल्पकार करमरकर यांची कार्यसंस्कृती स्पष्ट होत राहाते. म्हणून आज हे पुस्तक पुन्हा वाचले.

एका नामवंत शिल्पकाराच्या नामवंत कामगिरीचे, दुसऱ्या नामवंत शिल्पकाराने केलेल्या नामवंत वर्णनाचे, नामवंत प्रकाशकाने ( राजहंस प्रकाशन )प्रकाशित केलेले, नामवंत पुस्तक म्हणजे 'शिल्पकार करमरकर'.

ऑक्टोबर २०१५ मधे पहिली आवृत्ती आणि नोव्हेंबर २०२२ मधे दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेल्या या ३०९ पानी पुस्तकाचे पूर्ण नाव आहे 'आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर'!

या शीर्षकातले प्रत्येक अक्षर आणि प्रत्येक शब्द इतका सार्थ आहे की, त्यातील कोणत्याच शब्द -समूहाला उपशीर्षक म्हणणे हा त्या शब्द-समूहाचा अवमान ठरेल.

हे संपूर्ण पुस्तक म्हणजे एक नितांत सुंदर शब्दशिल्प आहे. याची प्रचिती पुस्तकाच्या सुरुवातीपासूनच यायला लागते ...

पुस्तकाच्या पाचव्याच पानावर ओळ आहे ....

''सर्व गोष्टींची मी किंमत सांगितली, पण शिल्प घडवताना एक फार मौल्यवान अशी चिमूटभर माती त्यात घालावी लागते. त्या चिमूटभर मातीसाठी ती उरलेली रक्कम आवश्यक आहे ... आम्ही कलावंत आमच्या आयुष्याची जी माती करतो, त्यातल्या चिमूटभर मातीची ती किंमत आहे.''

कारण कलावंताचे आयुष्य म्हणजे अपार वेदना आणि निर्मितीच्या उत्कट आनंदासह, साफल्याच्या भावनेला स्पर्श करणाऱ्या घटनाक्रमांचा एक पटच असतो.

या दोन ओळी म्हणजे या पुस्तकाचा ट्रेलर आहे.

या पुस्तकाचा संपूर्ण मजकूर इतका प्रत्ययदर्शी आहे की, हे पुस्तक वाचून झाल्या- झाल्या सासवण्यात जावे, तो सारा परिसर या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे पाहावा आणि मग तिथेच बसून हे पूर्ण पुस्तक पुन्हा एकदा अथपासून इतिपर्यंत वाचावे असे प्रत्येक वाचकाला वाटत राहते.

या पुस्तकाचे मला वाटलेले सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे याची सर्वांगीणता !

शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर (२ ऑक्टोबर १८९१ - १३ जून १९६७ ) उर्फ नानासाहेब करमरकर

धर्मशील मन म्हणजे अपार प्रेमाचा स्फोट असतो.

असा कथा विषय असताना करमरकर यांचे सरळसोट चरित्र लिहिले असते तरी ते वावगे ठरले नसते.

पण असे न होता, शिल्पकला, त्यातील संकल्पना, त्यातील प्रक्रिया, शिल्पकलेची आपल्या देशात व परदेशात असणारी तत्कालीन स्थिती - परिस्थिती - वस्तुस्थिती याचे या पुस्तकात येणारे नेमके चित्रण सर्वसामान्य वाचकाच्या सोयीचे ठरते.

शिल्पकार करमरकर यांना अश्वारूढ शिवाजी महाराज या प्रकल्पाचे काम ज्या गणपतराव म्हात्रे यांच्याकडचे काम काढून मिळाले त्या गणपतराव म्हात्रे यांची सुद्धा सविस्तर दखल हे पुस्तक घेते.

त्या व्यतिरिक्त 'करमरकर आणि समकालीन शिल्पकार' असे एक स्वतंत्र प्रकरणच या पुस्तकाच्या उत्तरार्धात आहे ... अगदी त्या त्या शिल्पकारांच्या नावाजलेल्या कलाकृतीच्या छायाचित्रासहीत !

सविस्तर संदर्भांची अशी या पुस्तकातील असंख्य उदाहरणे वाचकाला तृप्त आणि पुस्तकाच्या प्रतिपाद्य विषयाला संतृप्त करत राहतात.

या पुस्तकाचा अजून एक लक्षणीय भाग म्हणजे यातील शब्द - रचना किंवा शब्द - संपदा.

मुळातच माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकाचा शिल्पकला या विषयाशी आणि त्यातील तांत्रिकतेशी दुरान्वयेसुद्धा संबंध येण्याची शक्यता नसते. अगदी जाता - येता एखादे शिल्प दिसले तरी त्याचे नेमके सौंदर्य टिपण्याची ना माझी क्षमता आहे, ना तेवढा वेळ आहे.

त्यामुळे शिल्पकार नानासाहेब करमरकर यांनी निर्माण केलेली विविध शिल्पे बघताना आपण नेमके काय पाहिले पाहिजे याचे वर्णन अतिशय आर्जवाने लेखक सुहास बहुलकर या संपूर्ण पुस्तकात करत राहतात. अगदी वारंवार करतात !

उदाहरणार्थ, शिल्पकार करमरकर यांनी बनवलेला गांधीजींचा पुतळा हा विषय मांडताना लेखक सुहास बहुलकर सांगतात ... 'नजर खाली असतानाच डोळेही विचारमग्न भासतात'!

अशा उदाहरणांनी 'आकारवर्तना' सारखा आगळावेगळा शब्द वाचकाच्या मनात कायमचे स्थान मिळवून जातो.

या पुस्तकातला असाच एक सुंदर शब्द म्हणजे 'अनुकृती' !

निव्वळ कॉपी आणि प्रेरणा यातला फरक किती नेमकेपणाने हा शब्द सांगतो.

लेखक सुहास बहुलकर इथे इतके छान लिहून जातात .... 'शिल्पाकृती म्हणजे केवळ मूळ वस्तूची अनुकृती नव्हे.'

अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकसंध पुतळा निर्माण करण्याआधी शिल्पकार करमरकर यांनी शिवाजी महाराज यांचा जसा अभ्यास केला; तसा घोडे, अरबी घोडे, या विषायाचाही अभ्यास केला. त्याचे वर्णन या पुस्तकात असे येते ....

'शिकलेल्या घोड्याचे कान स्वाराच्या सूचना ग्रहण करण्यासोबतच स्वतःचे भय, आनंद, धोका, हट्ट, विरोध अशा भावनाही व्यक्त करतात व शेपटीही कानांना साथ देते.'

हे पुस्तक हातात घेतल्यापासून ते वाचून पूर्ण करून खाली ठेवेपर्यंत मला सारखी आमच्या गुंतवणूक क्षेत्राची आठवण होत होती ...

अशी आठवण येण्याचे पहिले आणि महत्त्वाचे कारण म्हणजे, या पुस्तकाच्या तपशीलांवर प्रस्तुत लेखकाने घेतलेली प्रचंड मेहनत! आमच्या गुंतवणूक

क्षेत्रात नेहमीच म्हटले जाते की, 'Deal with the details first as Details decide the deeds.' ... अन्यथा अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा एकसंध पुतळा निर्माण करण्याचे इतके तपशीलवार वर्णन सहजासहजी शक्यच नाही .... शिवाजी महाराजांची उंची ५ फूट ४ इंच होती आणि घोड्यावर स्वार असताना त्यांच्या हातात असणारी तलवार ५४ इंच लांब होती ही माहिती मी इतिहासकार आणि इतिहासतज्ज्ञ मंडळींनी लिहिलेल्या पुस्तकातसुद्धा याआधी कधी वाचली नव्हती!

* हे पुस्तक वाचताना गुंतवणूक क्षेत्राची आठवण येत राहण्याचे दुसरे कारण म्हणजे, मनाच्या उर्मीला प्रमाण मानत व प्राधान्य देत काम करावे लागणे हा सद्‌गुण (किंवा दुर्गुण) या दोन्ही क्षेत्रांत निर्णायक ठरतो.

* या दोन्ही क्षेत्रांत इतिहास निर्माण करणे आणि इतिहासजमा होणे यातली विभाजन रेषा नको इतकी अस्पष्ट आहे. अशी गुंतवणूक क्षेत्रातील असंख्य उदाहरणे माझ्या व्यावसायिक आयुष्याने मला दाखवली आहेत; तर अशा स्वरूपातील शिल्पकार करमरकर यांच्या आयुष्यातील काही प्रसंग या पुस्तकात दिले आहेत.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रांतील कामे शारीरिक, बौद्धिक व मानसिक अशी सर्वच बाजूंनी परीक्षा पाहणारी असतात.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या मंडळींचा या ना त्या स्वरूपात, या ना त्या मार्गाने, या ना त्या कारणाने ज्योतिष शास्त्रावर किंवा एखाद्या ज्योतिषावर विश्वास असतो.

* या दोन्ही क्षेत्रांत अचूक वेळ साधणे अत्यावश्यक असते आणि त्यात मनोधारणा (ध्यास या अर्थाने)आणि साधना (अभ्यास या अर्थाने) अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात.

* शिल्पकला आणि गुंतवणूक या दोन्ही क्षेत्रांत कार्यरत राहून यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वासाची आवश्यकता असते. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक सुहास बहुलकर यांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'असा आत्मविश्वास माध्यमावरील प्रभुत्व, अभ्यास, चिंतन, मनन आणि कार्यसंस्कृतीच्या अवघड पायऱ्या चढल्यावरच मिळतो.'

* लेखक सुहास बहुलकर प्रस्तुत पुस्तकात एके ठिकाणी शिल्पकला या संबंधात लिहितात ... 'ज्ञान, कौशल्य, सराव असल्याशिवाय सफाई येत नाही.' हे गुंतवणूक क्षेत्राविषयीही खरे आहेच की!

* या पुस्तकात दुसऱ्या एका प्रसंगात लेखक सुहास बहुलकर म्हणतात ... 'शिल्पकाराला मन, डोळे आणि डोके सतत वापरावे लागते !' गुंतवणूक तशीच असते की !

* 'कलावंताला स्वातंत्र्य, सोय आणि सहकार्य लागते' हे या पुस्तकातले वाक्य म्हणजे तर शिल्पकला आणि गुंतवणूक या क्षेत्राची सैद्धांतिक भूमिका ठरेल.!

शिल्पकार करमरकर ...

स्वतःची व्यक्ती म्हणून, शिल्पकार म्हणून, शिल्पकाम क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून, एकंदरीतच त्या संपूर्ण क्षेत्राची आदर्श आचार व विचार संहिता निर्माण करणारा भारतीय माती आणि मतीचा शिल्पकार म्हणजे शिल्पकार करमरकर !

आणि

(पृष्ठ क्र. २५ वर)

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्‌सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

पहिल्यापासून रायकांच्या मते चराऊ जमिनीची कमतरता हे सर्व दु:खाचे मुख्य कारण होते. उंटांची कायमची भूक व त्यांच्या पोषणाची अतिशय वाईट स्थिती या सर्वांचा त्याना त्रास होत असे. प्रत्येक दिवशी त्यांना हेच बघावे लागे व त्यांना त्या विषयी दुसरे काहीच करता येत नव्हते. रायकांना असे वाटे की, त्यांची स्थिती आपल्या मुलांना अन्न देता येत नाही अशा आई प्रमाणे होती. त्याचबरोबर त्यांच्या स्वतःच्या आर्थिक स्थितीवरही परिणाम झाला होता.

रुपाराम त्याच्या डायरीत लिहिले, 'जेव्हा उंट रिकाम्या पोटी किंवा अर्धपोटी असतात तेव्हा रोगराई वाढते. उंट जेव्हा भुकेले असतात तेव्हा गर्भपाताचे प्रमाण वाढते. पूर्वी उंट तीन किंवा चार वर्षांनी गरोदर राहत. आता सात वर्षं लागतात. त्यामुळे त्यांची संख्या कमी झाली आहे.

आता जंगलांची संख्याही कमी झाली आहे. झाडे व झुडपे कमी आहेत व चातुर्मासातही उंट भुकेले राहतात व आता लोक हिवाळ्यातही शेती करू लागले आहेत म्हणून त्यांना शेतातही नेता येत नाही. उंट हिवाळ्यात व उन्हाळ्यातही भुकेले राहतात. चातुर्मासात उंटांना जंगलात चरायला नेण्यासाठी प्रत्येक उंटामागे त्यांना १५० रु द्यावे लागतात. गरीब देवांसींकडे एवढे पैसे नाहीत. म्हणून उंट चातुर्मासातही भुकेले असतात.'

इल्स व त्यांना हे माहीत होते की, या प्रश्नावर जोरदार हल्ला केल्याशिवाय बाकी सर्व वरवरचे आहे. चरण्याची व वैरण, कडब्याची समस्या अतिशय गुंतागुतीची व कठीण होती. त्यापासून दूर राहणेच योग्य होते.

एकदा त्यांनी दूध विक्री प्रकल्पाच्या दरम्यान उंटाना हिरवा चारा द्यायचा प्रयत्न केला, पण उंटांनी अतिशय पौष्टिक व हिरवा रिजका (alfalfa) खाण्याची इच्छा दाखवली नाही. कोरडा चारा किंवा कडबा खाण्याची सवय असल्यामुळे ते त्यांची आवड व खाण्याची सवय बदलायला तयार नव्हते. शहरातील छोटे उंट खेजरी व बोरडी झुडपांचा कोरडा पाला खात, पण ते त्याच्या भागांत उपलब्ध नव्हते.

जरी त्यांनी ही चाचणी बंद केली तरी त्यांनी उंटांच्या आरोग्यावर त्यांचे प्रयत्न केंद्रित केले. तरीही, उंटांच्या कळपातील पौष्टिक कमतरता त्यामुळे त्यांचे पुनरुत्पादनावर होणारे नकारात्मक परिणाम, दूध उत्पादन आणि पिल्लांच्या वाढीचे दर या मूलभूत कारणाऐवजी केवळ लक्षणांवर उपचार करत आहेत अशी टोचणी, खंत त्यांना कायम लागली. त्यांची आरोग्यसेवा लोकप्रिय असली, तरी उंटांना पुरेसे पोषण पुरवण्याचा प्रश्न सोडवल्याशिवाय त्यांना यश मिळणार नव्हते.

उंटांच्या उपासमारीच्या स्थितीला कारणीभूत असलेले घटक समजून घेण्यासाठी त्यांना अनेक वर्षे लागली. त्यामध्ये उंटांच्या खाण्याच्या सवयी, जमिनीच्या मालकी हक्कातील बदल आणि जमीन वापराच्या पद्धती, लोकसंख्येचा दबाव, संवर्धन वृत्ती आणि दीर्घकाळ

प्रस्थापित सामाजिक संबंध व अवलंबून राहण्याची वृत्ती या सर्वांचा समावेश होता.

प्राणीशास्त्रज्ञ उंटांना 'ब्राउझर' म्हणून त्यांची विभागणी करतात, कारण ते झाडे आणि झुडुपे पसंत करतात. ते जमिनीवर चरतात, उदाहरणार्थ, थिसल, या एका काटेरी फुले असलेल्या व झुबकेदार पानांच्या एका सदाहरीत झुडुपावर. झाडाच्या फांद्या पसंत करतात, ज्या ते तुटून येईपर्यंत खाली खेचतात, नंतर जवळजवळ व्हॅक्यूम-क्लीनर सारखी पूर्ण पाने काढून टाकतात. ते ३.५ मीटर उंच फांद्या पर्यंत पोहचू शकतात. फक्त जिराफ व चढणाऱ्या शेळ्या आणखी लांब पोहचू शकतात.

टोकदार व अतिशय वाईट काटेरी झाडांची त्यांना काही समस्या अथवा अडचण येत नाही. उलट ते अशी झाडे पसंत करतात.

राजस्थानात उत्कृष्ट चाऱ्याची झाडे आहेत. ज्यांच्यात भरपूर पौष्टिक पर्ण संभार आहे. त्यापैकी अनेक शेंगा वर्गीय कुटुंबात आहेत. त्यांच्यात भरपूर प्रथिने असतात. उंटांना मुख्यतः बाभळीच्या वेगवेगळ्या जातींची झाडे आवडतात. उदा. खेजरी व देशी बाभूळ. त्यांनी एकूण ५२ वनस्पतींच्या जातींची नोंद केली जी उंट खातात. त्यांच्याही भागात त्या वनस्पती मिळतात.

१९४७ पूर्वी सर्व जमीन महाराजांकडे होती, पण प्रत्येक गावांत सामुदायिक कुरण असे. त्यांना यासाठी थोडी फी द्यावी लागे. शिवाय महाराजांना जनावरांचे महत्त्व माहीत होते त्यामुळे त्यांच्या शिकारी जागेतही जनावरांना चरण्याची परवानगी मिळत असे. या जागेला 'गुदारा' असे म्हणत. १९४७ नंतर मोठा बदल झाला. जमीन धारणेचा कमाल मर्यादा कायदा आला. महाराजे व सरदार, मोठे जमीनदार यांना त्यांच्या जमिनीचे हक्क कमी करावे लागले व काही जमिनी अनुसुचित जाती व जमातींच्या लोकांना फुकट मिळाल्या. ज्या जमिनी एकेकाळी सर्वांच्या मिळून होत्या, त्या जमिनींच्या खाजगीकरणाचा व त्याच्या परिणामाचा अर्थ कळायला रायकांना खूप वेळ लागला. रायकांनी या जमिनीमध्ये गुंतवणूक करण्याच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले. त्यांची जात पंचायतही त्यांना खाजगी जमिनीत गुंतवणूक करण्यांस मज्जाव करत असे. जास्तीतजास्त हालचाल रहावी म्हणून पक्की घरे बांधण्यास विरोध करत होते. हे ज्या भागांत पाऊस बेभरवशी आहे व जिथे जास्तीतजास्त वनस्पती व झुडपे असतील तिथे स्थलांतर करणे योग्य पद्धत होती. त्यामुळे एकाच ठिकाणच्या वनस्पतींचा जास्त वापर टाळता येणार होता. राजस्थान व इतर दुष्काळी भागात फिरत्या जनावरांच्या कळपाची पद्धत ही एकाजागी गोठ्यांत राहणाऱ्या पद्धतीपेक्षा जास्त फायदेशीर होती. त्यामुळे कळपात फिक्स डिपोझिट प्रमाणे आपोआप वाढ होत असे.

पण डिझेल पंपाच्या सहाय्याने अनेक शेतकरी दोन, तीन सुद्धा पिके घेऊ लागले. त्यामुळे त्यांच्या शेतात ते उंटाना चरण्यासाठी, खतांसाठी बोलवत नाहीसे झाले. लागवडीखालील जमिनी व्यतिरिक्त आणखी काही पडीक जमीन असते जी चरण्यासाठी उपयोगांत येऊ शकते तिच्याकडेही कोणी लक्ष देत नाहीसे झाले. तिच्यावर विलायती बाभळी, (proposes juliflora) ची वाढ झाली. गौचर जमिनीकडेही ग्रामपंचायत समितीचे दुर्लक्ष होते. काही शक्तिशाली लोक तिचा उपयोग घरे बांधण्यासाठी करतात.

१९७१ मध्ये कुंभालगरचे वन्यजीवन अभयारण्य पाली, उदयपूर, राजसामंड जिल्ह्यात लेपर्ड, स्लोत बेअर, हायना, सांबर व जंगल फाऊल यांचे नैसर्गिक वास्तव्य जपण्यासाठी, ५८२ चौरस किमी व आरवली पर्वताचा पश्चिमेकडील ८५ किमी. हा संरक्षित भाग म्हणून घोषित करण्यात आला. हा दुर्दैवाने, परंपरागत गोदवार व जोजवार उंट पालकांच्या व स्थानिक जनावरे पाळणाऱ्यांच्या

मन स्वतःच प्रकाश देते अशा मनाला अनुभवाची गरज नसते.

पावसाळी चरण्याच्या कुरणाच्या मध्ये आला. फी भरून चरायला राखीव कुरणांवर परवानगी होती. पण आता त्याच्यावरही पावसाळ्यांत बंदी घालण्यात आली जेव्हा त्याची सर्वांत जास्त गरज असते. जंगल व्यवस्थापनाच्या मते, पावसाळ्यात चरायची परवानगी दिली की, वृक्ष व वनस्पतींचे नुकसान होते. रायका ही गोष्ट नाकारतात. त्यांच्यामते चरण्यामुळे झाडांच्या वाढीला प्रोत्साहन मिळते व काही पर्यावरण शास्त्रज्ञ याला मान्यता देतात. उंट एक किंवा दोन चावे घेतात व ते नंतर काही शेकडो मीटर भटकून परत पुढचे घास घेतात. उंट जास्त जागेवर पसरतात. त्यामुळे झाडा झुडपांवर व वनस्पतीवर त्याचा वाईट परिणाम होत नाही. तसेच गादीप्रमाणे आवरण असलेल्या उंटाचे तळवे मातीवर अलगदपणे ठेवले जातात. शेळ्यामेंढ्यां प्रमाणे त्यांच्या तीक्ष्ण खुरांप्रमाणे घुसळून नाही.

पशुधनाचा वनस्पती आणि जैवविविधतेवर होणारा परिणाम हा अत्यंत वादग्रस्त आणि भावनिक मुद्दा आहे. उत्कृष्ट संवर्धनाच्या दृष्टिकोनातून, पशुधन चरणे हे सर्व वाईटाचे मूळ आहे जे आपोआप वनस्पतींचे नुकसान करते आणि वाळवंटीकरणाच्या दुष्ट चक्रात अडकते. पशुधन व वन्यप्राणी हे वन्यप्राणी संरक्षणासाठी विसंगत (दोन्ही एकत्र वाढू शकत नाहीत.) असल्याचे मानले जाते, मग ते राष्ट्रीय उद्यान असो किंवा अभयारण्य. त्यातील पहिली पायरी म्हणजे पशुधन बाहेर काढणे. जेव्हा संरक्षित क्षेत्रे तयार केली जातात तेव्हा आत किंवा सीमेवर राहणारे लोक त्यांच्याकडील पशुधन बाहेर चरायला पाठवण्या ऐवजी, संकरित गाई व गोठांत पोसण्यात प्रोत्साहित केले जाते. राजस्थानच्या रणथंबोर नॅशनल पार्कमध्ये, जे वाघांच्या संख्येसाठी प्रसिद्ध आहे. तेथे संकरित गुरे व गोठ्यात चरणे हे दुग्धालय व जनावरांसाठी आरोग्य कार्यक्रम चालू करून पाठिंबा दिला. पण अशा प्रकल्पांना यश मिळालेले नाही. गीरच्या अभयारण्यांत गुरांचे उच्चाटन केल्यामुळे सिंह, गुरेढोरे ही त्यांची आवडती शिकार असल्यामुळे अभयारण्याच्या बाहेर पडले.

पशुपालकाबद्दल अधिक सहानुभूती असलेले संरक्षक मानतात की पशुधन, वनस्पती आणि वन्यजीव दीर्घ कालावधीत एकत्र विकसित झाले आहेत आणि जैवविविधता, व्यवस्थापित चरण्याच्या ताणाखाली वाढते. ते निदर्शनास आणतात की, अनेक वनस्पतींना भरभरून वाढण्यासाठी चरण्याची आवश्यकता असते. आणि काही वन्यजीव पशुधनाच्या उपस्थितीवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, राजस्थानच्या भरतपूर पक्षी अभयारण्यात, म्हशींना चरण्यास बंदी घातल्यावर सायबेरियन क्रेन येण्याचे थांबले: म्हशींनी पाण्यातील तणांची वाढ नियंत्रणात ठेवली होती; त्यांच्याशिवाय या वनस्पती भरमसाठ वाढल्या आणि क्रेनला त्यांच्या आहारातील मुख्य घटक असलेले कंद खोदण्यापासून रोखले. वन्यजीव आणि पशुधन यांच्यातील अशा सहजीवनाची अनेक उदाहरणे भारताच्या इतर भागांतून नोंदवली गेली आहेत. उदाहरणार्थ, स्थलांतरित पक्ष्यांसाठी भारतातील सर्वांत मोठे हिवाळ्यातील कुरण ओडिशातील चिलिका तलावाच्या पर्यावरणासाठी पाळीव म्हशी अविभाज्य आहेत. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे डॉ. बाळाराम साहू यांनी नोंदवल्याप्रमाणे, म्हशी रात्रीच्या वेळी तलावात पोहतात आणि त्यांच्या खतामुळे माशांची संख्या टिकून राहते. शिवाय, त्यांच्या पावलांचे ठसे छोटी डबके तयार करतात ज्यामध्ये स्थलांतरित पक्ष्यांना अन्न देणारे कीटक प्रजनन करतात.

जागतिक स्तरावर, पशुपालक आणि वन्यजीव यांच्यातील पर्यावरणीय संबंधांबद्दल जागरूकता वाढत होती आणि २००३ मध्ये, जागतिक उद्यान परिषद World parks Conference (संवर्धनाचा एक मोठा मेळावा ज्यामध्ये दर दहा वर्षांनी आयोजित केला जातो)

जगभरातील पर्यावरणवाद्याकडून भटक्यादेशी लोकांसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. भटक्या समाजातील बागडीराम यांच्याबरोबर हणवंतसिंग अनुवादक म्हणून गेला. त्यांनी व इतर भटक्या जमातींतील प्रतिनिधींनी भर दिला की, पशुपालक आणि स्थानिक समाजांनी अनेक पारंपरिक पद्धती विकसित केल्या, उदा. फिरून चरणे, संरक्षित कुरण राखणे, लहान गटांमध्ये कळपांचे विभाजन करणे आणि वनस्पतींचे संरक्षण करण्यासाठी पुन्हा बियाण्यासकट पेरणी करणे. शेवटी वनस्पती हा त्यांच्या उपजीविकेचा पाया आहे, म्हणून त्याचे पालनपोषण आणि संरक्षण करणे. स्वतःचे सर्वोत्तम हित त्यांचे संरक्षण व पालनपोषण करणे हे आहे. पशुपालकांच्या विचारविनिमयाची नोंद घेतली आणि सभेचा निकाल स्थलांतरित लोकांच्या फायद्यांबद्दल इतर समाजासाठी औपचारिक घोषणा करण्यात झाला. या घोषणेला जागतिक उद्यान परिषदेच्या प्रतिनिधींनी मान्यता दिली.

पशुपालकांना पर्यावरणाचे रक्षक म्हणून मान्यता देण्याच्या या चळवळीपासून प्रेरित होऊन, त्यांनी आरवली डोंगरावरील वनस्पतीवर उंट चरण्याच्या परिणामांवर संशोधन सुरू करण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. त्यांना आशा होती की, ते शास्त्रीय कारणासह अभयारण्य व्यवस्थापनात धोरणात्मक बदल घडवून आणू शकतील आणि योग्य ठिकाणी नियंत्रित उंट चरण्यास कायदेशीर मान्यता देऊ शकतील. परंतु अशा संशोधनाला खूप वेळ लागतो व पावसाचा वार्षिक कमी-जास्त प्रमाणाचा विचार करून संशोधनाला दीर्घ कालावधी आवश्यक असतो. अगदी शास्त्रीय कारणं देखील वन अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी पुरेशी नाहीत. या व्यतिरिक्त, भारतातील अनेक सरकारी विभाग परस्परांवर अनिष्ट परिणाम करतात. वन अधिकारी अशा मूळच्या नैसर्गिक जंगल ठेवण्याच्या त्यांच्या इच्छेमध्ये प्रामाणिक असू शकतात जे वन्यप्राण्यांना पशुधन चरण्यापासून सुरक्षित आश्रय देते. परंतु काही लोक जंगलांतील साधनसंपत्ती मिळविण्यासाठी व जंगलात प्रवेश करू इच्छिणाऱ्या अनेक लोकांकडून बेकायदेशीरपणे लाच किंवा दंड आकारून त्यांचे खिसे भरतात.

जवळजवळ त्या परिसरांत राहणारे सर्व खेड्यांतील लोक जंगलावर अवलंबून असतात. जंगल किंवा त्याचा वापर करणे त्यांना सोयीचे वाटते. हे एखाद्या सुपरमार्केट प्रमाणे आहे, जे लोकांच्या दैनंदिक गरजा भागवते. ग्राहकांमध्ये आदिवासींचा समावेश होतो. आदिवासी बायका वाळलेले लाकूड गोळा करतात व त्यांच्या डोक्यावर वाहून साद्री मार्केटला नेतात. शेतकरी म्हशींच्या चाऱ्यासाठी पळसाच्या फांद्या तोडतात व त्यांच्या सायकलीवरून घरी घेऊन जातात. मोठ्या संख्येने लोक ज्यांच्याकडे गॅस स्टोव्ह नाही आणि ज्यांना त्यांचे वैयक्तिक सरपण आवश्यक आहे ते लोक याचा साठा करून ठेवतात. रायका व्यतिरिक्त, ज्यांना दररोज आपल्या प्राण्यांसाठी अन्न शोधावे लागते, त्या आदिवासी स्त्रिया पोट भरण्यासाठी जंगलावर अवलंबून असतात. वाळलेल्या लाकडाचा डोक्यावरचा भारा विकून त्या एक वेळचे जेवण मिळण्या एवढे पैसे मिळवतात.

याची तुलना जे मोठ्या नफ्यासाठी जंगले खणतात त्यांच्याशी केली असता हा वापर खूप कमी आहे. बेकायदेशीर कामांकडे डोळेझाक करून जास्तीचे उत्पन्न मिळवण्यास भरपूर वाव आहे. जर रायकांवर विश्वास ठेवायचा असेल तर, वन अधिकाऱ्यांच्या श्रेणीप्रमाणे यंत्रणेत थोडीशी फसवणूक करून जास्तीत जास्त फायदा मिळविण्याची त्यांची पद्धत आहे. अभयारण्य नियमांनुसार, संरक्षित क्षेत्रापैकी काही चाळीस टक्के किंवा त्यापेक्षा जास्त भाग चराईसाठी खुला ठेवावा लागतो, तर बाकीचा भाग पुनरुत्पादनासाठी बंद करावा लागतो, ज्या आवारात वनस्पती पुनरुत्पादनाची संधी दिली जाते व पुन्हा ते

सात वर्षांनी उघडले जातात. परंतु असे होत नाही. त्यापैकी अनेका भाग दहा ते वीस वर्षे किंवा त्याहूनही अधिक काळ बंद ठेवण्यात आले आहेत. ते हिरवेगार आणि पौष्टिक हिरवाईने भरलेले असतात. तर अधिकृतपणे उघडलेले भाग तपकिरी माती दिसेपर्यंत चरण्यात आलेले असतात. कदाचित म्हणून उंटपाळांना मनापासून – आपल्या प्राण्यांना चांगले अन्न खाताना पाहिल्याच्या समाधानासाठी जे काही पैसे आहेत ते स्वेच्छेने खर्च करायची इच्छा होते.

डर्क फ्लोटर, एक पदव्युत्तर जर्मन विद्यार्थी, ज्याने त्यांच्यासोबत त्यांचे क्षेत्रीय संशोधन केले, एका विशिष्ट गावात या प्रणालीची गुंतागुंत शोधली. कायदेशीर घोषित केलेले आणि अधिकृत चराई शुल्काविरुद्ध उपलब्ध असलेले एकमेव चराई क्षेत्र जंगलात अतिशय आतल्या भागांत आहेत आणि तेथे जाण्यासाठी दोन ते तीन तास लागतात. त्यामुळे प्रत्येक दिवशी कळपांना चार, ते सहा तास त्यांच्या चरण्याच्या जागेपर्यंत जाण्यास व परत येण्यास घालवावे लागतात.

जंगलातील एक छोटासा तलाव हा परिसरात पाण्याचा एकमेव स्रोत आहे. आहे. परंतु वनअधिकाऱ्यांनी सर्व मार्ग बंद करून या तलावात प्रवेश करणे जवळजवळ अशक्य केले आहे. पाण्याच्या जवळ फक्त उरलेला प्रवेश म्हणजे एक उंच उतार आहे, जो पावसाळ्यात खूप निसरडा होतो. उंट, ज्यांचे सपाट, घर्षणहीन पाय वाळवंटातील वाळूसाठी अनुकूल आहेत, ते नियमितपणे या उतारावर पडतात आणि त्यांचे पाय मोडतात. त्यांच्या भागात उंटांमध्ये फ्रॅक्चरच्या जास्तीचा घटनांनी नेहमीच आश्चर्य वाटत होते. त्याचे हे स्पष्टीकरण आहे.

हळूहळू रायकांचा इल्स व त्यांच्यावरचा विश्वास वाढला व त्यांनी ते जंगलांतील अधिकाऱ्यांचे कसे गिऱ्हाईक झाले आहेत ते सांगितले. अनेक दशके ते नियमितपणे कायद्याने ठरवलेल्या शुल्कापेक्षा कितीतरी जास्त पैसे चरण्याची फी म्हणून देत होते. त्यांची जनावरे उपाशी राहू नयेत म्हणून व वनअधिकाऱ्यांच्या मर्जीत रहावे म्हणून हजारो रुपये देत होते. या व्यतिरिक्त दर वर्षी प्रत्येक गावांतून एक शेळी याची वनअधिकाऱ्यांना सवय झाली होती व त्यांना तो त्यांचा हक्क वाटत होता.

हणमंत संतापला, कारण जंगलाचे रक्षण करण्याविषयी त्याला मनापासून वाटत होते, जसे रायकाविषयी त्याला वाटत होते. त्याने लाचखोरीच्या घटनांची दखल घेऊन त्यांनी किती पैसे खिशात घातले व गुन्हेगारांची यादीही तयार केली. वनमंत्री साद्रीला भेट देणार हे समजताच, त्याने सर्वरायकांना एकत्र केले. साद्रीचे सर्व रस्ते रायकाने गजबजले होते आणि त्यांचा रस्ता लाल पगडींच्या समुद्रात बदलला होता. जेव्हा मंत्री आणि त्यांचे कार्यकर्ते त्यांच्या एका स्थानिक पक्ष मित्रासह भेटायला गेले, तेव्हा जमावाने नियुक्त केलेल्या पांढऱ्या दाढीच्या रायकांच्या शिष्टमंडळाने मंत्र्याला दोन शब्द बोलण्याची विनंती केली. त्यांनी मंत्राला ओवाळले आणि परिचयानंतर, त्यांनी त्यांना एक कागदाचा तुकडा दिला. काही दिवसातच, यादीतील सर्व अधिकाऱ्यांना राजस्थानच्या दुसऱ्या टोकाला नवीन जागेवर जाण्याचे आदेश मिळाले!

परंतु कायदेशीर परिस्थिती सतत प्रवाही असते. पारदर्शकतेपासून दूर असते, आणि एक दिवसात दुसऱ्या दिवशीही बदलू शकते. मार्च २००० च्या मध्यात, हणमंत आणि ती साद्रीच्या गर्दीच्या मुख्य रस्त्यावरून मोटारसायकलवरून वळणे घेत मार्ग काढत होते, विक्रेत्यांना त्यांच्या मोडक्या तोडक्या गाड्या, गायी, डुक्करांची पिल्ले केर आणि रस्त्यावरील कुत्र्यांच्या नेहमीच्या जमावाला चुकवत होते. तेव्हा एक जुनी झालेली स्थानिक फॉरेस्ट रेंजरची जीप त्यांच्या जवळ आली.

तो कागदाचा एक छोटा तुकडा हलवत बाहेर डोकावला. जो त्याने मोठ्या हसत आमच्या हातात दाबला. हे नुकतेच आले आहे – 'नवीन ऑर्डर. कृपया नोंद घ्या.'

तो कागदाचा एक जर्जर तुकडा होता, दाणेदार करड्या रंगाच्या कागदावर चुकीच्या पद्धतीने फोटोकॉपी केलेला होता आणि वाचता येत नव्हता; वाचणे सोपे नव्हते. त्यांना अक्षरशः परिश्रमपूर्वक प्रत्येक शब्दांचा अर्थ लावण्याची गरज होती. त्यांनी त्यावर काही काळ विचार केल्यानंतर हे स्पष्ट झाले की, या तुकड्यात वन विभागाच्या विविध स्तरांद्वारे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला होता. मूळ आदेश १९९६ मध्ये इंग्रजीमध्ये जारी करण्यात आला होता आणि वन्यजीव अभयारण्यांमधून वाळलेल्या आणि ओल्या लाकडासह, तसेच गवत आणि पानांसह कोणत्याही प्रकारची वन उत्पादने नेण्यास मनाई होती. त्याचे हिंदीत भाषांतर करण्यात आले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हिंदी आवृत्तीमध्ये चराई हा अतिशय सक्त मनाई केलेला उद्योग होता. जरी याचा इंग्लिश आवृत्तीमध्ये उल्लेख देखील केला गेला नव्हता.

जर ही ऑर्डर खरी असेल तर, त्याचे परिणाम नाट्यमय आणि सर्वांत जास्त अवलंबून असलेल्या वनाचा वापर करणाऱ्या दोन गटांसाठी विनाशकारी असेल. ही बातमी रायकामध्ये पसरल्यावर अनेक मेंढीपालकांची तात्काळ प्रतिक्रिया अशी होती की, त्यांना आपली जनावरे विकावी लागतील. मेंढ्यांच्या किंमती प्रती पन्नासपेक्षा जास्त घसरल्या होत्या.

आदेशाच्या शहाणपणाबद्दल वनपाल देखील अस्वस्थ होते, गवत तोडण्याकडे दुर्लक्ष केल्याने जंगलात आग लागण्याची शक्यता अधिक असते. आणि नकोअसलेली व फोफावणाऱ्या आक्रमक परदेशी बाभळी पासून प्रत्येकजण सुटका करू इच्छित होता – ती काढणेही आदेशानुसार बेकायदेशीर होते. ते काय करू शकत होते?

अनेक महिन्यात काहीही नाट्यमय घडले नाही आणि काही महिन्यात सर्वकाही नेहमीप्रमाणे सामान्य व सुरळीत झाले. म्हणजे निश्चितच रायकांनी वनपालांना नेहमीपेक्षा जास्त लाच देऊ केली आणि काही आढेवेढे घेतल्यानंतर ती स्वीकारली गेली असणार. कमीत कमी परवडणाऱ्या आदिवासी महिलांनाही हेच लागू होते. असे दिसते की, कडक नियमांनी जंगल वाचवण्याच्या प्रत्येक प्रयत्नाने केवळ लाचखोरीसाठी जास्तीची संधी निर्माण केली.

रायकासाठी, पावसाळ्याच्या सुरुवातीला परिस्थिती नेहमीच गंभीर होते जेव्हा त्यांना माहीत असते की, त्यांच्या उंटांना जंगलाशिवाय इतर ठिकाणी चरायला जागा नाही. वर्षाच्या या वेळी, ते हणमंतच्या पाठीमागे लागून त्याला त्रास देऊन त्यांना वाटत होते की, हणमंत त्यांना मदत करू शकेल. ते त्याच्यावर विश्वास ठेवत होते. हणमंतकडे या समस्येला सामोरे जाण्याची शक्यता त्याने फक्त उंटांच्या दुधाच्या संदर्भातील जनहित याचिकेची पुनरावृत्ती करण्यात पाहिली. जोधपूरच्या उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणे राजस्थानमधील उंटांची लोकसंख्या कमी होण्यास वन नियम कारणीभूत आहेत, असे सांगून, येथील जोजवारच्या रायकांच्या नावाने खटला सादर करणे.

जोधपूर जो वकील त्यांचा खटला घेण्यास तयार झाला त्याच्यासाठी विस्तृत सर्व माहिती असलेली फाईल ज्यामध्ये उंटांचा चरण्याचा वनस्पतींवर परिणामाचा शास्त्रीय लेख, लोकसंख्या आकडेवारी, आर्थिक महत्त्व, या सर्वांचा समावेश होता.

उंटांचे महत्त्व आणि क्षमता, तसेच प्राण्यांच्या अनुवांशिक संसाधनांचे नुकसान व प्रक्रिया याबद्दल

माहिती. त्यांच्या वकिलाने एक प्रभावी केस तयार केली, कामकाज बघणाऱ्या न्यायाधीशांमध्ये (sitting. judges) ज्याने मार्च २००३ मध्ये उंटांच्या बाजूने निर्णय दिला. राजस्थानच्या सरन्यायाधीशांनी उंट महत्त्वाचे असून त्यांना चरण्यासाठी जागा आवश्यक असल्याचे मान्य केले. त्यांनी सांगितले की, उंट हे राजस्थानच्या जैवविविधतेचा एक महत्त्वाचा भाग आहे ज्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे आणि जोजावरमधील उंटांना चराईचे अधिकार देण्याचे आदेश त्यांनी ग्राम वन समित्यांना दिले.

या निर्णयाचा आनंद फार काळ टिकला नाही. २००४ मध्ये, केंद्रीय अधिकार प्राप्त समिती (CEC), २००२ मध्ये भारतातील जंगले आणि वन्यजीव वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या विशेष संस्थेने सर्व राज्य सरकारांना २००० च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचा सल्ला देणारे पत्र पुन्हा प्रसारित केले. दळणवळण, चराई हे पूर्वी नमूद केलेल्या सर्व संरक्षित क्षेत्रांमध्ये काटेकोरपणे निषिद्ध गणले गेले होते, ज्याचा संदर्भ दिलेल्या मूळ ऑर्डरमध्ये प्रत्यक्षात त्याचा उल्लेख नव्हता.

अशा प्रकारे, २००४ च्या उन्हाळयात, राजस्थानच्या वन विभागाने हक्कधारकांना चरायला परवानगी देण्याच्या राजस्थान उच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाच्या विरोधात जाऊन नेहमीच्या चराईचे परवाने देण्यास नकार दिला. थोडक्यात, याचा अर्थ रायकाचे प्रदीर्घ परंपरागत हक्क पूर्णपणे रद्द करणे असा होता.

पूर्वीचे आदेश अद्याप वैध होते की नाही हे शोधून काढले, परंतु यामुळे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवले गेले. फेब्रुवारी २००६ पर्यंत, त्यांच्या वकिलाने रायकांच्या वतीने सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला ज्याचा अर्थ कुंभलगढ अभयारण्यातील रायकाच्या पारंपरिक चराईच्या हक्कांवर बंदी घालणे असा आहे की नाही हे स्पष्ट करण्याची विनंती केली होती. जी पूर्वी राजस्थान उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात दृढ केली होती. दिनांक २६ मार्च २००३. बंदी लागू झाल्यास, रायका एक सांस्कृतिक आणि वांशिक गट म्हणून आणि त्यांनी पैदास केलेले उंट नजीकच्या भविष्यात अस्तित्वात नाहीसे होतील.

प्रत्युत्तर म्हणून, सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल २००६ मध्ये सीईसी, तसेच राज्य सरकारला जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत त्यांचे उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. अपेक्षित उत्तरांबद्दल ते श्वास रोखून वाट बघत होते. पण अचानक, बगदीरामजी, हणवंत आणि तिला इथिओपियाच्या एका दुर्गम भागातून जनावरांचे प्रजनन करणाऱ्यांच्या जागतिक मेळाव्यासाठी आमंत्रित केले गेले. ही एक अनोखी संधी होती जी ते गमावू इच्छित नव्हते. त्यांनी जाण्याचा निर्णय घेतला. हणमंत त्यांच्या अनुपस्थितीत इथिओपियामधून काय चालले आहे यावर लक्ष ठेवण्यासाठी आयोजकांच्या सॅटेलाइट फोनचा वापर करण्याचा प्रयत्न करीत होता, परंतु LPPS कार्यालयात पोचू शकत नव्हता.

दिल्लीत उतरताच हणमंतचा मोबाईल नॉनस्टॉप वाजू लागला, साद्रीच्या मदतीसाठी ओरडून. ''आम्ही आमचे प्राणी यापुढे जंगलात चरू शकत नाही. कृपया जंगल उघडण्यासाठी काहीतरी करा! तू कुठे आहेस? आम्ही ऐकले आहे की तू केस हरला आहेस आणि म्हणून जैसलमेरमध्ये लपला आहेस! धन्यवाद देवा तू परत आलास. तुझा मृत्यू झाल्याची अफवा आम्ही ऐकली आहे! साद्रीला लवकर परत ये.''

दुपारी उदयपूरला उड्डाण करण्यापूर्वी हणवंत आणि बागडीराम त्यांच्या वकिलांना भेटायला गेले आणि

रायका संघर्ष समितीच्या चौकशीसाठी सीईसीचे उत्तर त्यांनी मिळवले. अंधार पडल्यावर ते साद्रीला पोहोचले आणि (लो-डाउन देणारा एकमेव व्यक्ती म्हणजे मांगीलाल) एक मेंढीपालक आणि LPPS चे बोर्ड सदस्य. त्याने गोंधळांत टाकणाऱ्या बातम्यांना खात्री दिली. हो, जनावरांचे कळपांना आता गेल्या चार दिवसांपासून जंगलांत जाण्यास बंदी आणली आहे.

दुसऱ्या दिवशी त्यांना दोन संशोधकांकडून पॅाल रॅाबिन्स व अनिल छनगानी यांच्याकडून जे कुंभलगडच्या पर्यावरणांवर प्रकल्प करत होते त्यांच्याकडून जास्तीची माहिती मिळते. ते स्पष्टपणे CEC च्या भेटी विषयी व आता सर्व जनावरे जंगलात चरण्याऐवजी रस्त्यावर चरतात त्याचे वर्णन करतात.

पण काही शक्तिशाली (वजनदार) लोक खोटी बातमी पसरवतात की, जोपर्यंत रायका हणमंतला भेटतात तोपर्यंत जंगल उघडणार नाही. त्यांना रायकांनी हणमंतवर दाखवलेल्या विश्वासामुळे त्याचा हेवा वाटतो. रायका IPP च्या लोकांची हणमंतने काही दिवस गप्प व स्वस्थ बसावे म्हणून दारे ठोठावतात. तरीही दोन-तीन दिवसांत काहीही हलचाल नसते. आता तेच लोक परत हणमंतला बोलावू लागतात. तो निरोप पाठवतो की, तो फारसे काही करू शकत नाही. रायकांनी स्वतःहून काहीतरी करणे गरजेचे आहे. तो सांगतो, एखादे निदर्शन करा व तुमची ताकद दाखवा.

जास्त रायका विनंत्या अर्ज देण्यास सुरवात करतात. ते उतावळे होतात. तो त्यांना CEC ने संकलित केलेली माहिती, त्यांच्या जनावरांचा नंबर व जमीन धारणे विषयीच्या माहितीचे खंडन करायला सांगतो. LPPS चा स्टाफ फॅार्म घेऊन त्याची खरी माहिती पंच्यांकडून गोळा करून सरपंच व पटवारीकडून प्रमाणित करून घेतात.

हळूहळू उत्तरे येऊ लागली, त्यामुळे हे निश्चितपण झाले की CEC ने चुकीची माहिती दिली होती. पशुधनाचे वर्गीकरण जातीप्रमाणे न करता ते सर्व रायकाचे दाखवले होते. गाई व म्हशी ज्या पूर्णपणे दुसऱ्या जातीतर्फे पाळण्यात येतात त्याही रायकांकडे दाखवल्या होत्या. जमिनीचे मालकीहक्कही चुकीचे दाखवले होते.

तो एक तणावाचा काळ होता आणि त्यांची मनस्थिती खराब होती. कारण त्यांना वाटले की, सर्वकाही त्यांच्या विरुद्ध रचले होते. या त्रासामागे गोरे लोक असल्याच्या अफवा पुन्हा समोर आल्या. इल्सने जंगल विकत घेतले आणि चरण्यासाठी बंदी घातली असेही म्हटले होते! तरीही, त्यांनी माहिती गोळा करून, हिंदीतून इंग्रजीमध्ये पुरावे भाषांतरित करणे सुरू ठेवले, ज्यात कुंभलगडमधील परिस्थितीबद्दलच्या अनेक वृत्तपत्रांच्या कात्रणाचा समावेश होता.

हणमंत, हीराराम रायका, रायका संघर्षचे कार्यवाही ४ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली तेव्हा कामकाज बघण्यासाठी दिल्लीला गेले होते. त्यांच्या वकिलाने वस्तुस्थिती मांडली की, चरण्याचा मुद्दा रायकांना अनुकूल नसेल तर सामाजिक अशांतता अपेक्षित आहे. पण ते CEC चा वकील श्री हरीश साळवे याची बरोबरी करू शकत नव्हता.

सप्टेंबरपर्यंत, मुख्य वनसंरक्षक, मुख्य वन्यजीव वॉर्डन यांनी निष्कर्ष काढला: ...अरवली जैवविविधतेच्या शेवटच्या अवशेषांपैकी एकाचे संरक्षण करण्यासाठी, अशी शिफारस केली जाते की कुंभलगड वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात चरायला परवानगी दिली जाऊ नये.

या टप्प्यावर ते फार काही करू शकत नव्हते. रायका प्रकरणाचा भारतातील इतर पशुपालक गटांवर

(पृष्ठ क्र. ३० वर)

# 'A La Carte अलास्का!'

*डॉ. जयश्री पवार यांनी मे २०२४ मध्ये पृथ्वीवरील नंदनवन 'अलास्का' प्रदेशाची सफर केली. ही सहल आयोजित करण्यापासून, ते सहल पूर्ण होईपर्यंत जो आनंद मिळाला, तो सर्वांबरोबर वाटून द्विगुणित करावा म्हणून त्यांचा हा लेखप्रपंच. सात दिवसाच्या या रम्य सफरीचं वर्णन त्यांनी 'A La Carte अलास्का!' या शीर्षकाअंतर्गत सात लेखांत प्रस्तुत केले आहे. त्या शृंखलेचे हे पाचवे पुष्प! – संपादक*

## ५. रमणीय केनाई द्वीपकल्प

प्रवासाच्या पाचव्या दिवसासाठी आम्ही सुवर्ड ते अँकरेज बसप्रवास आरक्षित केला होता. केवळ अलास्कातच नव्हे, तर पूर्ण अमेरिके मध्येदेखील हा एकशे पंचवीस मैलांचा प्रवास अत्यंत नयनरम्य 'रोड जर्नी' म्हणून विख्यात आहे. सकाळी नऊलाच आम्ही हॉटेल सोडले. अजून पर्यटनाचा बहर सुरू व्हायचा होता. फार प्रवासी नसल्यामुळे आमची चालक व गाईड मिस कोर्टनी मूर मर्सिडीज स्प्रिंटर व्हॅन घेऊन हॉटेल बाहेर आमची प्रतीक्षा करत होती. अतिशय उमद्या स्वभावाच्या कोर्टनीने आम्हाला अलास्का बद्दल बरीच रोचक माहिती दिली. कोर्टनी मूळची इथलीच. अँकरेजच्या सीमेजवळच्या भागात ती राहते, तर केनाई मध्ये तिचे सासर आहे. तिचा अलास्का वरील जिव्हाळा, विषेषतः या केनाइ भागासाठीची आपुलकी पदोपदी जाणवत होती. तिच्या लाघवी स्वभावामुळे थोड्याच वेळात आमची मैत्री झाली आणि अनेक विषयांवर आम्ही गप्पा मारू लागलो. तिच्याबरोबरच एक शिकाऊ गाईड होते तेही गप्पांमध्ये सामील झाले. देश, भाषा, या सर्वांपलीकडे जाऊन गप्पा रंगल्या.

सुवर्ड वरून साधारण बारा मैलांवर एक्झिट ग्लेशियर जवळ गाडी थांबली. 'हार्डिंग आईसफील्ड' मधून उगम पावणाऱ्या या हिमनदीवर चालत जाता येते; तेथे फेरफटकाही मारता येतो. आम्ही मात्र वेळेअभावी लांबूनच तिचे दर्शन घेतले. लांब वर दिसणाऱ्या केनाई पर्वतरांगा, थोडी गोठलेली आणि बाकी संथपणे वाहणारी हिमनदी– शब्द अपुरे पडावेत असं सृष्टीसौंदर्य! आणखी थोडं पुढे गेल्यावर केनाई तलाव लागला. हिमनदीच्या निळ्याशार पाण्याने भरलेला हा शांत तलाव मनाला प्रफुल्लित करून गेला. समिट तलाव, पोर्टेज हिमनदी आणि पोर्टेज तलाव बघत बघत अलास्का वाईल्ड लाईफ कन्सर्वेशन सेंटरला पोहोचलो.





'अलास्का वाईल्ड लाईफ कन्सर्वेशन सेंटर' हे सुवर्ड–अँकरज रस्त्यावरील, प्रत्येकाने पाहायलाच हवं असं अभयारण्य आहे. अलास्कातील वन्यजीवांचे संगोपन, संरक्षण, व संवर्धन; त्यांच्याबद्दल जनमानसाला

स्मृतीतील अनुभव हा मागील शरद ऋतूतील गळून पडलेल्या पानासारखा मृतवत् असतो.

जागरूक करणे; आणि त्यावरील संशोधन या सर्वांसाठी ही संस्था समर्पित आहे. एकवीस एकरांत पसरलेल्या या भव्य वास्तूत अनेक जखमी, अनाथ व हरवलेले प्राणी आणले जातात. विशेष म्हणजे त्यांना पिंजऱ्यात बंदिस्त न करता, त्यांचे नैसर्गिक निवासस्थान येथे उभे केले जाते व प्राण्यांना तेथे ठेवले जाते.

गव्यांसारखा अनेक नष्ट होणाऱ्या होण्याच्या मार्गावर असलेल्या प्रजातींचे संवर्धन करण्यात या अभयारण्याने मोलाची भूमिका बजावली आहे. रेनडिअर, करडी व काळी अस्वले, कोल्हे, लांडगे, जंगली कुत्रे, 'wood bison' हि गव्याची जात, जंगली मांजर, साळींदर, विविध जातींची हराणे, मूस, 'bald eagles' नावाचे गरुडपक्षी, असे अनेक अलास्कन वन्यजीव आम्ही येथे जवळून बघितले. कोर्टनी आठवड्यातून अनेकदा या रस्त्यावरून प्रवास करते, आणि बहुतेक वेळा येथे येते. ती अतिशय उत्साहाने येथील प्रत्येक प्राणी आणि पक्ष्यांची माहिती देत होती. विशेष म्हणजे त्यांपैकी प्रत्येकाला येथे कधी व कोठून आणले; त्याची कशी जपणूक केली; त्याचे वय काय, कुठचे प्राणी नामशेष होण्याचा मार्गावर आहेत, त्यांच्या संवर्धनासाठी येथे काय प्रयत्न चालू आहेत; हे सगळे तिला ठाऊक होते. जणू काही हे सगळे तिचे सगेसोयरेच आहेत असे वाटत होते.

येथेच 'मस्क ऑक्स' या विशिष्ट जातीच्या अलास्कन बैलांबद्दल माहिती मिळाली. ते बघितले देखील! या बैलांवर थंडीपासून संरक्षणासाठी किवीयात (quiviut) नावाचे लोकरीसारखे मऊ केस असतात. त्यापासून अतिशय उबदार कपडे बनवले जातात. किवीयात लोकरीपेक्षा खूप महाग असते; एका मीटर साठी साधारण दहा ते वीस हजार मोजावे लागतात. अँकरेज मध्ये खास किवीयात वस्त्रांचे दुकान आहे अशी माहिती कोर्टनीकडून मिळाली. सुमारे अडीच तास आम्ही येथे होतो.

अँकरेज कडे येताना 'टर्नअगेन आर्म' ही नदी लागते या भागाला मोठा रोचक इतिहास आहे. सतराशे अठ्ठ्याहत्तर साली प्रसिद्ध ब्रिटिश खलाशी 'कॅप्टन कुक' जेव्हा येथे आला, तेव्हा ही संथ वाहणारी सरळसोट नदी असावी असे त्याला वाटत होते. पण त्याच्या गलबताला इतक्यांदा वळणे घ्यावी लागली आणि नॉर्थवेस्ट पॅसेज या समुद्राला न मिळता परत फिरावे लागले, की त्याने 'टर्न अगेन आर्म' असे तिचे नामकरण केले.

या नदीला भयावह भूतकाळ देखील आहे. वरवर पाहता या नदीचे पात्र ओहोटीच्या वेळी अगदी सखल भासते. परंतु प्रत्यक्षात मात्र हा दलदलीचा प्रदेश आहे. शिवाय भरतीच्या वेळी अचानक पाण्याची पातळी वाढून जलसमाधी मिळू शकते. मासेमार आणि प्रवाशी फसून बुडाल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे या नदीपात्रात जाऊ नये अशा सूचना गाईड सतत देतात.

अजून एका भौगोलिक आश्चर्यासाठी पर्यटक खास करून येथे येतात. ते आश्चर्य म्हणजे 'बोअर टाइड (bore tide)'. जगात अगदी मोजक्या ठिकाणी हे आश्चर्य अनुभवायला बघायला मिळते. अतिशय उथळ पात्र असणारी नदी जेव्हा समुद्राला मिळते, तेव्हा तिच्या पाण्याचा प्रवाह समुद्राच्या दिशेने असतो. सागराच्या भरतीच्या वेळी मात्र समुद्राचे पाणीच अतिशय वेगाने या नदीकडे वळते. अशावेळी साधारण ताशी चाळीस किलोमीटर इतका प्रचंड वेग असलेल्या तीन ते बारा फूट उंच लाटा निर्माण होतात; इतक्या उंच, की खास करून सर्फिंग (surfing) चा थरार अनुभवण्यासाठी लोक येथे येतात. अमावस्या, पौर्णिमा व त्यांना लागून असलेल्या दिवसात हे आश्चर्य बघायला मिळते. वाऱ्याची दिशा, नदीची खोली, अशा अनेक बाबींवरही लाटेची

केवळ एकाग्रता असेल तर विचार संकुचित, मर्यादित आणि भंगणारा होतो.

उंची अवलंबून असते. जगातील इतर भागात बोअर टाइड दिसत असल्या, तरी बर्फाच्छादित पर्वतांनी वेढलेले अलास्का सारखे मनोहर निसर्ग सौंदर्य तेथे नाही. त्यामुळेही हा भूभाग विशेष आहे. आम्ही अमावस्या-पौर्णिमा काळांत येथे नसल्यामुळे हे आश्चर्य बघता आले नाही.

बेलुगा व्हेल्स पाहण्यासाठी बेलुगा पॉईंटजवळ आम्ही थांबलो. व्हेल्स दिसले नाहीत, पण टर्नअगेन आर्मचे मंत्रमुग्ध करणारे सौंदर्य मात्र मनाला सुखावून गेले. बोअर टाइड बघण्यासाठी सुद्धा पर्यटक नेहमी येथे येतात असे कळले.

मागे नमूद केल्याप्रमाणे वाटेवर वन्यप्राणी बघणे हा अलास्का सफरींमधील मधील महत्त्वाचा भाग! आजच्या प्रवासात एक्झिट ग्लेशियरवरून पुढे आल्यावर एक bald eagle दिसले. शिवाय बेलुगा पॉईंटजवळ आम्हाला 'dall sheep' जातीच्या सात-आठ मेंढ्यांचा कळप दिसला. खरं सांगायचं तर तो इतका दूरवर होता, आम्हाला काही लक्षात आला नाही. पण कोर्टनीची नजर इतकी तीक्ष्ण, की तिच्या लगेच लक्षात आलं अन् तिने आम्हाला तो दाखवला. लांबून त्या मेंढ्या अक्षरशः ठिपक्या एवढ्या दिसत होत्या. त्यांना निवांतपणे डोंगर चढताना पाहून गम्मत वाटली.





केनाई वरून अँकरेज कडे येताना 'हिमनद्यांचा प्रदेश' असे सार्थ बिरुद मिरवणारा 'Girdwood' हा प्रदेश लागला. सात हिम नद्यांनी तो वेढलेला आहे. अलायस्का पर्वताच्या खोऱ्यात वसलेला हा नयनरम्य प्रदेश स्कीईंग (skiing) साठी सुप्रसिद्ध आहे.

गर्डवूड मध्ये शाकाहारी रेस्टॉरंटस फारशी नाहीत. त्यामुळे कोर्टनी तिच्या ओळखीच्या 'बॅसॅकॅम्प रेस्टॉरंट' मध्ये आम्हाला शाकाहारी भोजनासाठी घेऊन गेली. कोर्टनीलाही आमच्याबरोबर जेवायची विनंती केली. इकडे प्रवाशांबरोबर गाईडने जेवलेले चालत नाही, शिवाय मी थोडी माझी घरची कामही करून घेईन, ती म्हणाली. तिच्या लेकीच्या शिकवणीबाबत तिला फोनवरून व्यवस्था करायची होती. भारत असो वा अलास्का-बायकांचे व्याप काही संपत नाहीत! मी तिला म्हणाले, आणि ती माझ्याकडे बघून सूचक हसली. अत्यंत रुचकर अशा पिटा ब्रेड आणि हुमस या पदार्थांवर ताव मारला; पोट आणि मन भरून जेवण करून आम्ही अलायस्का रिसॉर्टकडे निघालो.

अलायस्का रिसॉर्टजवळ खास बांधलेल्या पायवाटेवरून, आणि एरिअल ट्राम मधून मंत्रमुग्ध करणाऱ्या निसर्गसौंदर्याचे दर्शन होते असे वाचले होते. परंतु अती बर्फदृष्टीमुळे हा भाग पर्यटकांसाठी बंद होता.

त्यामुळे आम्हाला तेथे जाता आले नाही. खाली उतरताना प्रत्येक वळणावर निसर्गरूपी चित्रकाराच्या नवनवीन कलाकृती आमच्यासमोर सादर होत होत्या. त्या मनात साठवत अँकरेजकडे निघालो.

अलास्काचं सौंदर्य जरी मोहक असलं, तरी इथे कायमचं वास्तव्य मात्र खडतर आहे; असं स्थानिक लोकांशी बोलताना पदोपदी जाणवतं. हिवाळ्यातील कडाक्याची थंडी व बर्फवृष्टी, दिवसरात्रीचे बदलते गणित, बेभरवशाचे हवामान ही कारणे आहेतच. भूकंप, ज्वालामुखी, वणवे अशा अनेक आपत्तींना तोंड देत अलास्कन्स खंबीरपणे उभे आहेत. ध्रुवीय डोंगराळ प्रदेश असल्यामुळे येथे भूकंपाचे प्रमाण जास्त आहे. स्थानिक लोक अशा नैसर्गिक आपत्तींना धीराने तोंड देतात. एकोणीसशे चौसष्ट सालचा भूकंप मात्र ते अजूनही विसरू शकलेले नाहीत. ९.२ रिश्टर स्केलचा हा भूकंप चार मिनिटे चालला. तो इतका तीव्र होता, की टर्नअगेन आर्म आठ फूट खचली; आणि गर्डवूड व पोर्टेज या नगरांना जलसमाधी मिळाली. या आपदेमधूनही लोक जिद्दीने उभे राहिले, पण त्यांच्या बोलण्यात या भूकंपाची आठवण आल्याखेरीज राहत नाही. इतकी की या भूकंपाचे चित्रण व त्याचे परिणाम अँकरेजमधील अर्थक्वेक पार्क मध्ये नोंदवण्यात आले आहेत. शिवाय भविष्यात जर असे संकट आले तर त्याला तोंड देण्यासाठी विशिष्ट रचनेची घरे येथे बांधली जातात.

सायंकाळी उशिरा हॉटेल वर पोहोचलो. कोर्टनीचा निरोप घेताना मन भरून आलं. या मंतरलेल्या दिवसाच्या स्मृती आजही मनात पिंगा घालतात.

**– डॉ. जयश्री पवार**
सहाय्यक प्राध्यापिका
जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)
ठाणे

(पृष्ठ क्र.१३ वरून – **आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर**)

त्या आदर्श जीवनाचा आलेख शब्दबद्ध करणारा आजच्या काळाचा तसा शिल्पकार म्हणजे सुहास बहुलकर (प्रस्तुत पुस्तकाचे लेखक)!

हे पुस्तक वाचून पूर्ण करत असताना मला हिंदी व उर्दू साहित्यातला 'धरोहर' हा शब्द वारंवार आठवत असतो .

धरोहर या शब्दाचा कागदोपत्री अर्थ आहे 'वारसा' किंवा 'परंपरा' !

पण व्यवहारात हा शब्द त्यापेक्षा कितीतरी जास्त चांगल्या अर्थाने उपयोगात आणला जातो.

त्यानुसार आता कार्यरत असणाऱ्या आजच्या पिढीने आपल्या पुढील पिढीला आपल्या आधीच्या पिढीचा दाखला देत एकंदरीतच आपले क्षेत्र, त्यातील आपले घराणे समजावून सांगणे म्हणजे 'धरोहर' !

हे पुस्तक तसे आहे.

जणू काही शिल्पकार नानासाहेब करमरकर या आधीच्या पिढीतील दिग्गजांच्या परिचयाच्या निमित्ताने आजच्या पिढीतले आघाडीचे शिल्पकार सुहास बहुलकर सर्वसामान्य वाचकाच्या आजच्या पिढीला शिल्पकारी समजावून सांगत आहेत अशा अर्थाने 'धरोहर असणारे पुस्तक म्हणजे आयुष्याची मौल्यवान माती : शिल्पकार करमरकर' !

**– चन्द्रशेखर टिळक**
सी–४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

# आपली वनसंपदा

*'फळे व वनस्पती' यांची आपल्या जीवनात किती उपयुक्तता आहे याचा आढावा सदर लेखात घेतला आहे.- संपादक*

**आंबा**

आंबा हा सदाहरित वृक्ष अनाकार्डेसी कुलातील असून त्याचे शास्त्रीय नाव मांजीफेरा इंडिका आहे. आंब्याची लागवड भारतात सु. ४००० वर्षांपूर्वी पासून होत असावी असे मानतात. अठराव्या व एकोणीसाव्या शतकात युरोपातील लोकांनी भारतातून ही वनस्पती अन्य उष्ण कटिबंधातील प्रदेशात ही नेली. ब्राझील, भारत, ऑस्ट्रेलिया, फिलिपिन्स, मध्य व दक्षिण अमेरिका इ. प्रदेशात या वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात होते. भारतातून जम्मू आणि काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड या राज्यातील टेकड्यांचे प्रदेश सोडून सर्वत्र आंब्यांची लागवड होते.

हा वृक्ष सु. २५ मीटरपर्यंत उंच वाढू शकतो. खोडाची साल जाड, काळपट, खरबरीत व भेगाळलेली असते. पाने साधी, गर्द हिरवी, एकाआड एक चकचकीत लांबट भाल्यासारखी व चिवट असतात. देठाचा खालचा भाग फुगीर असतो. फुले लहान, एकलिंगी वा द्वीलिंगी एकाच झाडावर लालसर किंवा पिवळट व तिखट वासाची असून परीमंजरीत (मोहोर) येतात. साधारणपणे जानेवारी-मार्चमध्ये आंब्याला मोहोर येतो. मोहोर आल्यावर साधारण पाच महिन्यांत फळ पिकते. फळांची साल हिरवी, नारिंगी, शेंदरी लाल किंवा पिवळ्या रंगाची असू शकते. फळात मोठी, चपटी एक कोय असते. फळांचा आकार स्वाद रंग वगैरे गुणप्रकाराप्रमाणे निरनिराळे असतात. सालीने वेढलेल्या फळात रसाळ गर असतो. कांही फळांमधील गर तंतूमय असतो. गरात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वे असतात. कच्च्या फळांना कैरी म्हणतात. कैरी आंबट, पाचक व शीतल तर पक्व फळे (आंबा) गॉड, सारक, व मूत्रल असतात. कच्ची फळे लोणची, मुरंबे, पन्हे आमचूर, यांकरिता. पिकलेली फळे खाण्यास, आंबापोळी, आणि मिठाईसाठी उपयुक्त असतात. खोडायच्या सालीतील ट्यनीनमुळे ती कातडी कमावण्यास आणि रेशीम, सूत व लोकर रंगविण्यास वापरतात. आंब्याचे लाकूड बांधकाम, शेतीची अवजारे आणि खोकी तयार करण्यासाठीही वापरतात.

भारतात आंबा ही नगदी पीक असून त्याची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. क्षेत्रफळाचा विचार करता आंब्याच्या लागवडीत उत्तर प्रदेश राज्याचा क्रमांक पहिला लागतो. आंब्याचे तोतापूरी, रायवळ, कलमी इत्यादी प्रकार आहेत. कलमी आंब्यांत हापूस, पायरी, नीलम, केशर रत्ना इ. जाती प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील हापूस जगप्रसिद्ध असून त्याला अतिशीत हवामान व कडाक्याची थंडी मानवत नाही. फळे तयार होताना त्याला कोरडे हवामान लागते. जगातील अनेक उत्कृष्ट फळांपैकी आंबा एक फळ असून त्याला 'उष्ण प्रदेशातील फळांचा राजा' म्हणतात.

**अंजीर**

वड, पिंपळ व उंबर या वनस्पतींच्या मोरेसी कुलातील हा वृक्ष असून त्याचे शास्त्रीय नाव फायकस कॅरिका असे आहे. हा पाणझडी वृक्ष मूळचा भूमध्य सामुद्रिक प्रदेशातील आहे.

अंजीर या वृक्षाची उंची ३-१० मीटर पर्यंत आढळते. याच्या फांद्या मऊ व राखाडी रंगाच्या असतात. पाने १२-२५ सेंमी. लांब आणि १०-१८ सेंमी. रुंद असून ती हृदयाकृती, किंचित खंडित व दातेरी असतात. अंजीराचे फळ ३-५ सेंमी लांब असून प्रत्यक्षात तो फुलांचा गुच्छ आहे. कपासारख्या या पुष्पविन्यासा मध्ये असंख्य एकलिंगी नर, मादी, व अलिंगी फुलांची मांडणी असते. तोंडाकडील भागात नरफुले असतात, तर खालच्या भागात मादी फुले असतात. तोंडाकडील बारीक छिद्रातून तरट (ब्लास्टओफगा) नावाच्या लहान कीटकाची मादी पुष्पविन्यासामध्ये प्रवेश करते. व थेट खालच्या भागातील मादीफुलाकडे जाते. अंगाला चिकटलेले व दुसऱ्या पुष्पविन्यासातील फुलांकडून आणलेले मादी फुलांवर पडून परपरागण होते. यावेळी कीटकाची मादी कांही फुलांमध्ये अंडी घालते. या अंड्यापासून नवीन पिढी निर्माण होते. यात काही नर तर बहुसंख्य माद्या असतात. त्यांचे मीलन आतच होते. मीलनानंतर नर मरून जातात. कीटकांच्या फलित माद्या नरफुलातील पराग घेऊन दुसऱ्या मादी फुलाकडे जातात. पुष्पविन्यासाचे रूपांतर औदुंबर प्रकारच्या फळामध्ये होते. मूळचा हिरवा रंग जाऊन तो अंजीरी होतो. हेच अंजीर होय.

अंजीराचे चार प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात सामान्य प्रकार येतो. यामध्ये परंगणाशिवाय बिया नसलेले फळ वर्षातून दोनदा बनते. दुसरा 'स्मरना' प्रकार अतिशय उत्तम फळ तयार करणारा आहे. तिसरा रानटी प्रकार आहे. 'सान पेद्रो' या चौथ्या प्रकाराच्या अंजीराची लागवड कॅलिफोर्नियात केली जाते. याला वरशातून दोनदा बहार येतो.

अंजीरचे पोषण मूल्य उच्च प्रकारचे असते. त्यापासून कॅल्शियम मिळते. तसेच यात फॉस्फरस, पोटॅशियम, बीटा कॅरॉटीन ('अ' जीवनसत्व) आणि 'क' जीवनसत्त्व असते. इतर कोणत्याही फळापेक्षा अंजीरात तंतुमय पदार्थ अधिक असतात. अंजीर विरेचक असून त्यात प्रति ऑकसिडीकारके अधिक असतात.

अंजीराचे पोर्तुगॉल, इटली, ग्रीस, अफगाणिस्तान, इराण व टरकी हे महत्त्वाचे उत्पादक देश आहेत. भारतात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांत अंजीराची लागवड केली जाते. पिकलेली ताजी अंजीरे रुचकर असतात. सुकविलेली गोड फळे तसेच त्यांचा मुरांबा खाल्ला जातो. पूर्ण पिकून गळून पडलेल्या अंजीरापासून खाण्यासाठी सुकी अंजीरे तयार करतात. सुकी अंजीरे बरेच दिवस टिकतात. ती इराण, अफगाणिस्तान आणि ग्रीसमधून आयात करण्यात येतात. भारतातही थोड्या प्रमाणात सुकी अंजीरे बनवितात. सुक्या अंजीरानची प्रतवारी त्यांच्या रंगावरून आणि आकारावरून ठरवितात. काजू, संत्री या फळांच्या बर्फीप्रमाणे अंजीराची बर्फी बाजारात मिळते.

**आघाडा**

ही वर्षायू ओषधी अमारांटसी कुलातील असून तिचे शास्त्रीय नाव 'अचीरानथस असपेरा' आहे. ही वनस्पती सर्वत्र (समुद्र सपाटीपासून सु. १,००० मीटर उंचीपर्यंत) मोकळ्या पडिक जागी किंवा कचऱ्याच्या आसपास तणाप्रमाणे वाढते. ती आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका येथील उष्ण प्रदेशांत आढळते.

आघाड्याची पाने साधी, समोरासमोर लंबगोल किंवा वर्तुळाकृती असून, पानांच्या खालच्या बाजूला मऊ लव असते. फुले हिरवट पांढरी व अनेक फांद्यांच्या टोकांना; लांब कणिश फुलोऱ्यावर नोव्हेंबर-जानेवारीत येतात. फुलोरा ४५ सेंमी पर्यंत लांब असू शकतो. फळे लहान, शुष्क व एकबीजी असतात. बी लहान व पिंगट असते. आघाड्याचा एक वेगळा प्रकार आढळतो. त्याचे सर्वच भाग लालसर असतात.

आघाड्याच्या भिजवून काढलेला रस सौम्य स्तंभक (आकुंचन करणारा) असतो. पानांच्या भुकटीचा काढा मधाबरोबर अतिसारात व आमांशात उपयुक्त ठरतो. बिया वांतिकारक व आलर्क रोगावर गुणकारी असतात. वनस्पतीचा रस तिखट रेचक व मूत्रवर्धक असून मूळव्याध, गळवे, चर्मरोग, शूल, इ. व्याधींवर देतात. या वनस्पतीची राख खोकला व दम्यावर उपयुक्त असते. तसेच ती रंगकामात व कपडे धुण्यास वापरतात. आघाड्याची राख मिसळलेले तिळाचे तेल कानदुखीवर व फक्त राख व्रणावर बाहेरून लावतात.

**आपटा**

आपटा हे फॅबेसी कुलामधील बौहेनिया प्रजातीतील शेंगा देणारे भरपूर व लोंबत्या फांद्यांचे वेडेवाकडे वाढणारे लहान झाड आहे. यांचे शास्त्रीय नाव 'बौहिनिया रेसिमोजा' आहे. हे भारत, श्रीलंका, चीन इ. देशातील पाणझडी वनांत आढळते. शोभेसाठी बागेतही हे झाड लावतात.

आपट्याची पाने साधी, अर्धवट विभागलेली आणि रुंदीला अधिक असून, वरून हिरवी तर खालून पांढरट असतात. फुले लहान पांढरी किंवा पिवळसर असून फेब्रुवारी ते मे मध्ये येतात. पाकळ्या पाच सुट्या असून पुंकेसर दहा असतात. शेंगा १५ ते २५ सेंमी लांब आणि १.८ ते २.५ सेंमी रुंद साधारण चपट्या व वाकड्या असतात. शेंगांतील बिया चपट्या व लंबगोल असतात. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये या बिया पिकतात व नंतर काही महिने झाडाला तशाच धरून राहतात. उन्हाळा संपताना या शेंगा गळून पडतात.

हिंदू लोक 'दसऱ्याचे सोने' म्हणून आपट्याची पाने वाटतात. बौहिनिया प्रजातीतील अनेक जातींच्या झाडांची पाने सारखीच दिसतात. आपट्याचे झाड औषधी आहे. हगवण, जुलाब यासारख्या पचनसंस्थेच्या रोगांवर आपट्याच्या सालीचा रस गुणकारी आहे. तसेच स्तंभक म्हणूनही या वनस्पतीचा उपयोग होतो. आपट्याच्या सालीपासून टॅनीन, धागे व डिंक मिळवितात. विड्या तयार करण्यासाठीही आपट्याची पाने वापरतात. बौहिनिया या प्रजातीखाली २०० हून अधिक वनस्पती येतात. 'झा आणि गारसपार बौहीन' या दोन वनस्पतीशास्त्रज्ञ बंधूंच्या नावांवरून 'बौहिनिया' हे प्रजातीवाचक नाव पडले आहे. या प्रजातीतील बौहिनिया टोमेनटोजा ही वनस्पती आपटा याच नावाने ओळखली जाते. बागेत व वनात दिसणाऱ्या या झाडाला 'पिवळा कांचन' म्हणतात.

**अफू**

अफू ही पापावेरसी कुलातील वनस्पती असून तिचे शास्त्रीय नाव 'पापावेर सोमनीफेरम' असे आहे. या वनस्पतीपासून अफू हा एक मादक विषारी पदार्थ मिळतो. तो कच्च्या फळांना चिरा पाडून मिळवितात. चिरा पाडल्यावर फळातून रस पाझरतो. वाळून घट्ट झालेला रस म्हणजे अफू.

मादक पदार्थ म्हणून अफूची लागवड प्राचीन काळापासून होत आली आहे. अफूचे झुडुप मूळचे पश्चिम आशियातील असून, अरबांकडून ते पूर्वेस चीनपर्यंत पसरले. तुर्कमेनिस्तान, इराण, रशिया, म्यानमार, थायलंड, लाओस, आणि भारत या देशांत अफूचे उत्पादन होते. भारतात अफूची लागवड उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आणि राजस्थान या राज्यापुरती मर्यादित केली आहे.

अफू हे ६० ते १२० सें. मी. उंची असणारे वर्षायू झुडुप आहे. याची पाने साधी, कमी-जास्त करवती काठांची, तळाशी खोडास वेढून राहणारी असतात. फुले देखणी, मोठी, पांढरी किंवा लालसर जांभळी असतात. फळांची बोंडे मोठी व गोलाकार असतात. बिया लहान, पांढऱ्या व विपुल असून, त्यांनाच 'खसखस' म्हणतात.

अफू हा पदार्थ वैद्यकीय दृष्ट्या उपयुक्त असलेल्या अल्कलॉइडांसाठी प्रसिद्ध आहे. फळांपासून मिळणारी अफू चवीला कडू, स्तंभक, मादक, वेदानाहारक असून ती बद्धकोष्टता निर्माण करते. जुलाब आणि हगवणीमुळे होणाऱ्या विकारांवर ती उपयुक्त ठरते. तिच्या बिया पौष्टिक असतात. खसाखशीपासून तेल काढतात. खाद्यपदार्थांमध्ये खसखस वापरतात. अफूचा मादकपणा खसखसीमध्ये नसतो. खसखशीचे तेल चित्रकारांचे रंग व साबण करण्यासाठी वापरतात.

अफूपासून मॉरफीन, कोडीन,नारकोटिन, पापावेरीन, थेबाईन वगैरे अल्कलॉइडे व त्यांची संयुगे प्राप्त होतात. प्रामुख्याने ही रसायने वेदानाशामक आहेत. मात्र हल्ली त्यांचा उपयोग 'मादक पदार्थ' म्हणून जास्त होतो.

नशेसाठी अफूचा उपयोग प्राचीनकाळापासून प्रचलित आहे. तिच्यामधील अल्कलॉइडे सेवन करून, धुरावाटे किंवा तिचा अर्क शरीरात टोचून वापरली जातात. नशेसाठी अफू सेवन केलेल्या व्यक्तीला पुन:पुन्हा सेवनाची इच्छा होऊन ती व्यक्ती व्यसनात कायमची गुरफटली जाते. जगातील बहुसंख्य राष्ट्रात अफूचे सेवन व निर्मिती बेकायदा ठरविली आहे. भारतामध्ये अफूच्या झाडाच्या लागवडीवर, उत्पादनावर कायद्याने नियंत्रण आहे. अफूचे शुद्धीकरण, प्रत, विक्री, निर्यात अल्कलॉइडांची निर्मिती इत्यादी सर्व बाबी सर्वस्वी भारत सरकारच्या अधिपत्याखाली होतात. भारत हा जगातील एकमेव मान्यताप्राप्त अफू निर्माण करणारा देश आहे.

**अहाळीव**

अहाळीव ही कृसी फेरी कुलातील वनस्पती आहे. तिचे शास्त्रीय नाव 'लेपीडियम सटीवहम' आहे. ही १४-१५ सेंमी उंचीची लहान व गुळगुळीत वर्षायू औषधी असून, ती मूळची इथियोपिया देशातील आहे. भारतामध्ये तिची विविध उपयोगांसाठी सर्वत्र लागवड केली जाते. अहाळीवाची पाने साधी, विविध,पूर्णत: किंवा अंशत: अखंड किंवा पूर्णपणे विभागलेली असतात. मुळांपासून निघाली आहेत अशी वाटणारी पाने लांब देठाची, तर खोडापासून निघालेली पाने बिन देठाची व रेषाकृती असतात. फुले लहान व पांढरी असून लांबट मंजरीवर येतात. फळे अंडाकृती व टोकास खाचदार असतात. फळांत लहान कप्पे असून प्रत्येक कप्प्यात दोन बिया असतात. बिया लांबट, टोकाला निमुळत्या व रंगाने लाल असतात.

ही वनस्पती सर्वकाळी व सर्वत्र पिकविली जाते. सखल भागात सप्टेंबर ते फेब्रुवारीत व उंच भागात मार्च ते सप्टेंबर मध्ये बी पेरतात. त्यानंतर थोड्याच दिवसात पाने कोशिंबिरीत किंवा कढीत घालण्यासाठी खुडून घेतात. बियांच्या वाढीसाठी ४-६ आठवडे लागतात. पाला घोड्यांना व उंटांना चारा म्हणून घालतात. दिवाळीत लहान मुले किल्ल्यावर हिरवळ म्हणून अहाळीवाचा वापर करतात. दमा, रक्ती मूळव्याध इ. व्याधींवर ही वनस्पती गुणकारी आहे. पाने उत्तेजक, मूत्रल व यकृताच्या विकारावर चांगली आहेत. बिया दुग्धवर्धक,रेचक, शक्तीवर्धक व मूत्रल आहेत. मुडपणे, दुखापत झाल्यावर त्यांचे पोटीस बांधतात.

**अळशी**

फुलझाडांपैकी अळशी ही झुडुप लायनेसी कुलातील एक झुडुप आहे. यालाच 'जवस' म्हणतात. वर्षभर जगणाऱ्या या वनस्पतीचे शास्त्रीय नाव 'लायनम असिट्याटीसीमम' आहे.

**आरारूट**

व्यापारी क्षेत्रात आरारूट हे नाव एका प्रकारच्या खाद्य पिठाला दिले आहे. हे विविध वनस्पतींपासून तयार करतात. त्यापैकी भारतात आरारूट ही युफोरबियसी

कुलातील 'मानिहॉट एसकयूलांटा' असे शास्त्रीय नाव असलेल्या वनस्पतीच्या ग्रंथिखोडापासून (बटाट्यासारख्या गाठदार खोडां पासून) मिळवितात. इंग्रजीत सामान्यपणे या वनस्पतीला 'कसावा, मानिओका किंवा टॅपीओका' असे म्हणतात. केरळ आणि तमिळनाडू राज्यांत या वनस्पतीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या वनस्पतीचे झुडुप २ -५ मीटर उंच असून, खोड आणि फांद्यांचे रंग वेगवेगळे असतात. पाने गळली की खोडावर व्रण मागे राहतात. ग्रंथिक्षोड गुच्छाने असतात. पाने हाताच्या आकाराची, फिक्कट, हिरवी,५-९ खंडी असतात. खंडे भालाकृती व लांब टोकाची असतात. फुले पिवळट किंवा हिरवट पांढरी व एकलिंगी असतात. फळांच्या बोंडात तीन बिया असतात. या वनस्पतीची ग्रंथिक्षोडे सोलून, धुऊन व कुटून तो लगदा चाळणीच्या रुंद नळ्यांतून गाळतात. त्यातून मिळणारा पिठूळ पदार्थ पाण्याबरोबर टाक्यांत जमा झाल्यावर वाळवितात. बाजारात आरारूट पांढरी स्वच्छ पूड अथवा लहान मोठ्या खड्यांच्या स्वरूपात मिळते. हे पीठ पचण्यास हलके असल्याने लहान मुलांना व अशक्त माणसांना चांगले मानवते. बिस्किटे, केक, पुडिंग व जेलई यात त्याचा उपयोग करतात. शिवाय खळ व चेहऱ्याला लावायची सुवासिक पूड यांकरिता आरारूट वापरले जाते. लगद्याचा चोथा गुरांना चारा म्हणून घालतात.

**– डॉ. राजाभाऊ ढेपे**
५, असुविद्या नगर
विजापूर रोड, सोलापूर

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***

***०२२-२५४२ ६२७०***

(पृष्ठ क्र. २१ वरून – **उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष**)

परिणाम होऊ शकतो या भीतीने, आमच्या वकिलाने आम्ही केस मागे घेण्याची शिफारस देखील केली. ते त्याच्या पर्यायांचा विचार करत असताना, रायकासाठी अत्यंत सुसंगत असलेला कायदा संसदेने अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) कायदा, २००६ मंजूर केला, जो सर्व जमातींना हक्क देईल जे त्यांनी जंगलाचा वापर तीन पिढ्या किंवा पंचाहत्तर वर्षांसाठी केला आहे हे सिद्ध करू शकतील.

कुंभलगढ अभयारण्याला राष्ट्रीय उद्यानात रूपांतरित करण्याच्या राजस्थान सरकारने फेब्रुवारी २०१२ मध्ये केलेल्या घोषणेनंतर सुमारे पाच वर्षांनंतर या घडामोडीने परिस्थिती पुन्हा पूर्णपणे बदलून टाकली.

वनसंस्थेतील काही सुज्ञ, धोरणी, दूरदर्शी नेत्यांनी पशुधनाच्या चराईविरूद्धच्या रूढीच्या पुनर्विचार केला नाही आणि ग्रामीण लोकांच्या समर्थनाची दखल घेतली नाही तर ते पुढील वर्षांसाठी पुढील कायदेशीर संघर्षांचा अंदाज घेत आहेत.

काही युरोपीय देशांमध्ये, जसे निसर्ग संवर्धन तिच्या मूळ देशांत जर्मनीत पशुधनाद्वारे चरणे हे सर्वात वारंवार वापरला जाणारा निसर्ग संवर्धन उपाय आहे व मेंढपाळांना (तेथे उंटांचे कळप नाही) त्यांचे सरकार बहुतेकवेळा पैसे देतात. मेंढपाळ करत असलेल्या पर्यावरणीय सेवेसाठी.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

•••

विद्या प्रसारक मंडळाचे

## वत्सला मूल्यशिक्षण केंद्र

**(स्थापना : रविवार दि. ६ जुलै २०२५)**



कुटुंब वत्सल व एक आदर्श प्रेमळ आई म्हणून कै. सौ. वत्सला वासुदेव बेडेकर यांनी वात्सल्याचा एक आदर्श निर्माण केला.

या आदर्श संस्कारांचे पाईक म्हणून त्यांचा हा वारसा पुढे सुरू ठेवण्याच्या प्रेरणेतून विद्या प्रसारक मंडळातर्फे वत्सला मूल्यशिक्षण केंद्राची स्थापना झाली.

सौ. सुमेधा बेडेकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून दोन तास सदर वर्ग घेतले जातील.

आपले भारतीय सण व उत्सव, भारतीय संस्कृती व परंपरेसोबत वैज्ञानिक दृष्टिकोन व राष्ट्रप्रेम आदी विषयांना स्पर्श करीत विविध कलांच्या माध्यमातून हसत खेळत भावी पिढीला घडवण्याचा व त्यातून एक उत्तम नागरिक निर्माण करण्याचा या वर्गाचा प्रयत्न असेल.

रविवारी ६ जुलै २०२५ आषाढीच्या दिवशी सदर वर्गाचे उद्घाटन झाले.

उद्घाटन प्रसंगी संस्कृत प्राध्यापिका व लेखिका सौ. मेधा सोमण, नीला कोरडे, वर्षाताई तळवेलकर, विद्या प्रसारक मंडळाचे डॉक्टर विजय बेडेकर, श्री. उत्तम जोशी व सौ. सुमेधा बेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सौ. ए. के. जोशी शाळेच्या इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी आषाढीनिमित्त वारीचे सादरीकरण केले आणि या भक्तीमय वातावरणात सौ. मेधाताई सोमण यांच्या मार्गदर्शनाने वर्गाला सुरुवात झाली. विद्यार्थी व पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'जीवन' ही एक जबाबदारी आहे. क्षणाक्षणाला दुसऱ्याला सांभाळत न्यावं लागतं !...

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

- **शाळेचा पहिला दिवस – १६ जून२०२५**

‘ही आवडते मज मनापासूनी शाळा
लाविते लळा जशी माउली बाळा.’

या कवितेप्रमाणेच दि. १६ जून २०२५ हा शाळेचा पहिला दिवस उजाडला व शाळेच्या परिसरामध्ये मुलांचा किलबिलाट सुरू झाला. शिक्षकांनी मुलांचे स्वागत केले. मुलांच्या येण्याने शाळेला जणू नवचैतन्य आले. नवीन वर्ग, नवीन मित्र–मैत्रिणी व नव्या शिक्षकांची मुलांनी ओळख करून घेतली. नवनविन खेळ, उपक्रम घेतले गेले. शिस्तीचे धडे देण्यात आले. व शाळेचा पहिला दिवस आनंदात व मजेत गेला.






**आंतरराष्ट्रीय योग दिन – २१ जून २०२५**

‘जपा मंत्र निरोगी आरोग्याचा,
करा निर्धार नियमित योग साधनेचा.’

२१ जून २०१५ हा दिवस संपूर्ण विश्वभरात ‘योग दिवस’ म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ए. के. जोशीच्या प्राथमिक विभागामध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. निरोगी शरीर, तसेच स्वस्थ मनासाठी योग अतिशय आवश्यक आहे हे मुलांना सांगण्यात आले. तसेच इ. १ली ते ४थीच्या मुलांना वेगवेगळी आसने शिकवण्यात आली. यामध्ये त्रिकोणासन, वृक्षासन, ताडासन, पद्मासन अशी वेगवेगळी आसने व त्यांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिके करण्यात आली. विद्यार्थ्यांना दररोज योगा करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. त्याचबरोबर शिक्षकांनीही योगसाधना केल्या व मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला.




- **चित्रकला स्पर्धा – २५ जून २०२५**

**रोशन जाल पटेल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित चित्रकला स्पर्धेचा अहवाल (कार्यक्रमाचा आढावा)–**

शाळेत इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी रोशन जाल पटेल यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा २५ जून २०२५ रोजी शाळेत पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि कलात्मकता वाढवण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला.






एक तासाच्या उत्साही चित्रकलेनंतर परीक्षकांनी चित्रांचे परीक्षण केले व निकाल जाहीर करण्यात आले. विजेत्यांना प्रमाणपत्रक प्रदान करण्यात आले.

- **आषाढी एकादशी निमित्त साजरा झाला भक्तीमय दिंडी उत्सव**

''सुंदर ते ध्यान उभे विटेवरी,
कर कटावरी ठेवोनिया ...''

या ओळी ऐकतानाच मन भक्तीमय भावनेने भरून येते. अशाच भक्तिसंपन्न वातावरणात सौ. ए. के. जोशी शाळा, ठाणे येथील प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी साजरी केली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शनिवारी ५ जुलै २०२५ रोजी दिंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामस्मरणात दिंडीत भाग घेतला. फुगड्या, पारंपरिक रिंगण, नृत्य, भजने यामधून विद्यार्थ्यांनी वारीचा आनंद लुटला.

या उत्सवात एक विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका 'स्वच्छता हीच ईश्वरसेवा'. प्लास्टिकमुळे होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकत त्यांनी सुजाण नागरिक म्हणून काय भूमिका निभावली पाहिजे याचे प्रभावी सादरीकरण केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग व आरोग्य संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली.

दिंडी उत्सवात आणखी एक प्रेरणादायी भाग होता - 'ऑपरेशन सिंदूर' या विशेष सादरीकरणाचे. भारतीय जवानांच्या त्याग व पराक्रमावर आधारित या सादरीकरणात विद्यार्थ्यांनी जवानांचा पोशाख, घोषणा व नाट्यरूपांतरातून देशभक्तीचे जिवंत दर्शन घडवले.

या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी संदेश दिला.

''देशासाठी सर्वस्व अर्पण करणारे वीर जवान हे खरे विठ्ठल भक्त, आणि विठ्ठलच त्यांचा पाठीराखा!''

शाळेचा संपूर्ण परिसर पताकांनी सजवला गेला होता. विद्यार्थ्यांनी भक्तीमय व देशभक्तिपर वातावरणात सहभाग घेत, एक अनुपम सांस्कृतिक व आध्यात्मिक अनुभूती साकारली.

या यशस्वी कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! त्यांची मेहनत, समर्पण आणि सादरीकरण कौतुकास्पद होते.

त्याचप्रमाणे शिक्षकवर्गाचे विशेष आभार, ज्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडला.



पालकांचेही मनःपूर्वक आभार, ज्यांनी आपल्या मुलांना या कार्यक्रमासाठी प्रोत्साहन दिले व आवश्यक तयारीत सहकार्य केले.

शाळेच्या सहाय्यक कर्मचारी, सजावट समिती, संगीत व तांत्रिक सहाय्य करणाऱ्या सर्वांचेही मनःपूर्वक कौतुक करण्यात येते.

एकत्र प्रयत्नांमुळेच हा कार्यक्रम आठवणीत राहणारा ठरला.

जय जय राम कृष्ण हरी !!!

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

बी.कॉम. इन फायनान्सियल मार्केट्स विभागाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक धोरणासंबंधात दिनांक ९ जून, २०२५ रोजी कात्यायन सभागृह येथे अभिमुखता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख एन.ई.पी. नोडल अधिकारी डॉ. मृण्मयी थत्ते होत्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाचे नियम व विषय व श्रेयांके याविषयी माहिती देण्यात आली.

राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेने जगजीवनराम इस्पितळ यांच्यासोबत संयुक्तपणे दिनांक १० जून, २०२५ रोजी ठाणे स्थानकावर रक्तदान शिबिर आयोजित केले. रक्तदानाविषयी जागृती निर्माण करणे व स्थानिक रक्तपेढीतील साठा वाढण्यास योगदान देणे हे या शिबिरामागचे प्रमुख उद्देश्य होते. एकूण ५६ जणांनी रक्तदान करून सामाजिक जबाबदारी, करुणा व सेवा ही मूल्ये सर्वांमध्ये जागृत केली.

बी.कॉम. इन अकॉउंटिंग आणि फायनान्स विभागाने GST दिवस १ जुलै २०२५ रोजी साजरा केला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये GST विषयी जागृती निर्माण करण्याचा असून, त्यानिमित्त अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते ज्यात नाटक, तसेच प्रश्नमंजुषा अशांचा समावेश होता. एकूण १२५ विद्यार्थी आणि ७ शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

### बेडेकर महाविद्यालयात इतिहासातील गंमतींवर परिसंवाद

मानवाच्या उत्क्रांतीत दगडाची खूप महत्त्वाची भूमिका दिसून आली आहे. दगडापासून निर्माण केलेली हत्यारे, शिकारीसाठी, स्वसंरक्षणासाठी, तसेच फळभाज्या, मांस कापण्यासाठी वापरली जात असत. त्याचप्रमाणे उत्खननात सापडलेले मडक्यांचे अवशेष, त्याकाळातील सामाजिक जीवनाबद्दल खूप माहिती देतात. नाणी ही त्याकाळातील व्यावहारिक जीवनाचे दर्शन घडवतात. अशाच पुरातत्त्वाची ओळख करून देणाऱ्या अवशेषांच्या प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते.

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे हे नेहमीच इतिहास, पुरातत्त्व व संस्कृती या विषयांवर अनेक उपक्रम राबवत असतात. सिंधू संस्कृतीवरील प्रदर्शनाच्या यशानंतर प्राच्यविद्या अभ्यास संस्था व 'इतिहासाच्या पाऊलखुणा' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने, ४ व ५ जुलै रोजी, पुरातत्त्वीय वस्तू आणि छायाचित्रांचे प्रदर्शन व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनात अश्मयुगातील ऐतिहासिक हत्यारे, नाणी, मडकी अशा सर्व गोष्टांचा समावेश होता. पुरातत्त्वज्ञ डॉ. जयंत जोगळेकर, इतिहासाचे सहाय्यक प्राध्यापक अंकुर काणे आणि सहाय्यक प्राध्यापिका साईश्रुती भट्ट यांच्या विविध भागांतील भटकंतीदरम्यान सापडलेल्या इतिहासाचा अमूल्य दस्तऐवज या प्रदर्शनातून नागरिकांसाठी खुला करण्यात आला होता.

'प – पुरातत्त्वाचा' असे ह्या प्रदर्शनाचे नाव असून, या प्रदर्शनात अश्मयुगातील हत्यारे, हडप्पा संस्कृतीतील मडक्यांचे अवशेष, महाजनपद काळातील नाणी, तसेच लेणी, मंदिरे, दुर्ग, यांची छायाचित्रे असे सर्व काही पाहण्यासाठी उपलब्ध होते. प्रदर्शनातील सर्व गोष्टींची माहिती इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक अंकुर काणे, प्राध्यापिका साईश्रुती भट्ट व त्यांचे महाविद्यालयीन विद्यार्थी देताना दिसले.

प्रदर्शनाच्या दोन्ही दिवशी इतिहास प्रेमींनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शनिवार ५ जुलै हा

प्रदर्शनाचा शेवटचा दिवस असून या दिवशी 'इतिहासातील गमती जमती' या विषयावर, 'इतिहासाच्या पाऊलखुणा' या संस्थेतील पुरातत्त्वज्ञ श्री कौस्तुभ कस्तुरे, श्री सौरभ वैशंपायन, श्री संकेत कुलकर्णी, श्री तुषार माने, व डॉ. सागर पाध्ये यांचा परिसंवाद ठेवण्यात आला होता.

ह्या परिसंवादाला, वि.प्र.मं. चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सुचित्रा नाईक, तसेच इतिहास व इतर विभागातील प्राध्यापकांनी आवर्जून उपस्थिती दर्शवली. मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री रुपेश महाडिक यांनी ह्या व्याख्यानाचे सूत्रसंचालन केले.

नावाला साजेसा अशा ह्या परिसंवादात इतिहासातील अनेक न माहीत असलेल्या गमती जमती श्रोत्यांना कळल्या. कुठलीही घडलेली घटना ही इतिहास असते असं म्हणत सुरू झालेल्या ह्या परिसंवादात काही किस्स्यांतून औरंगजेबाबद्दल माहिती, शिवाजी महाराज व पेशवे बाजीराव ह्यांच्या आयुष्यात घडलेल्या समान घटना, रशिया स्वीडन च्या युद्धाची कहाणी, अमेरिकेचा स्वयंघोषित सम्राट अशा सर्व गोष्टींची माहिती देण्यात आली. संवादाच्या शेवटी श्रोत्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

**उद्घाटनपर सत्र**

२०२५-२०२६ शैक्षणिक वर्ष ९ जून २०२५ पासून सुरू झाले. द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर व उपप्राचार्य श्री. अभिजीत काळे यांनी उद्घाटन पर सत्रातून विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली.





Mastering Binary NAAC Maturity-Based NAAC Mechanism

बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाच्या इंटरनल क्वालिटी अ‍ॅश्युरन्स सेल (IQAC) आणि फ्युचर फेस टेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २४ जून २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत Mastering Binary NAAC Maturity-Based NAAC Mechanism या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. एकूण १३१ सहभागी (कॉलेजबाहेरील ८३ प्राध्यापक आणि ४८ अंतर्गत प्राध्यापक) या कार्यशाळेला उपस्थित होते. याव्यतिरिक्त, प्रशासनाशी संबंधित शेवटच्या सत्रात २५ अंतर्गत कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन श्री. पीयूष पहाडे, अध्यक्ष, आयक्यूएसी क्लस्टर, इंडिया यांनी केले श्री. पीयूष पहाडे हे या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते होते. पहिल्या सत्रात, पहाडे सरांनी मान्यता प्रक्रियेत बदल करण्याची गरज यावर भर दिला. त्यांनी NAAC मूल्यांकनाच्या नवीन बायनरी पद्धतीचा आढावा दिला. त्यांनी संस्था कोणत्या विविध स्तरांवर अर्ज करू शकते याबद्दल स्पष्टीकरण दिले. बायनरी सिस्टीमचे दहा मूलभूत घटक आणि इनपुट, प्रोसेस, आऊटपुट व इम्पॅक्ट ही चतुःसूत्री कशी वापरावी हे समजावून सांगितले. त्यानंतर त्यांनी श्रोत्यांना ONOD च्या नवीन पोर्टलची म्हणजेच 'वन नेशन वन डेटा' ची ओळख करून दिली, जे संस्थेच्या डेटा पडताळणी, प्रशासन आणि सुधारणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. प्रत्येक पायरीचे महत्त्व त्यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले.

दुसऱ्या सत्रात, पहाडे सरांनी सहभागींना शेअर्ड सॅम्पल स्टँडर्ड फॉरमॅटनुसार अक्टिव्हिटी रिपोर्ट तयार करायला लावला. सर्व सहभागींनी डमी ॲक्टिव्हिटी रिपोर्ट तयार करण्यात सक्रियपणे भाग घेतला. या सत्रामुळे सर्वांना पद्धतशीर दस्तऐवजीकरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात मदत झाली. नंतर सरांनी अभ्यासक्रम रचनेचे वैशिष्ट्य सांगितले. या वैशिष्ट्यात, आवश्यक प्रशासकीय संस्था (अभ्यास मंडळ, शैक्षणिक परिषद, प्रशासकीय मंडळ), सीओ-पीओ मॅपिंग आणि आवश्यक कागदपत्रांसह निकालावर आधारित शिक्षणाची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम लवचिकता, व्यावहारिक आणि उद्योग लक्ष केंद्रित करणे आणि व्यावहारिक कौशल्य अभिमुखता, आयकेएस, ऑनलाइन शिक्षण आणि अभ्यासक्रम सुधारणा यावर चर्चा करण्यात आली.

दुपारच्या जेवणानंतरचे सत्र श्री. अलघ सिंग, संचालक, एफएफएल आणि श्री. अंकित पाटीदार, नॅकसल्लागार यांनी घेतले. श्री. अलघ सिंग यांनी एफएफएलच्या कंपनी प्रोफाइलची ओळख करून दिली आणि त्यानंतर श्री. पाटीदार यांनी सत्राचे नेतृत्व केले ज्यामध्ये त्यांनी गणनेचे महत्त्व आणि नॅकच्या आवश्यकतेनुसार प्रभावी 'डेटा संकलन आणि प्रक्रिया' करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरात कंपनी कशी मदत करू शकते हे सांगितले.

श्री. पीयूष पहाडे यांनी पुन्हा एकदा बायनरी सिस्टमच्या उर्वरित वैशिष्ट्यांवर चर्चा करून सत्र पुन्हा सुरू केले. अध्यापन संसाधनांच्या वैशिष्ट्यात, मानक भरती प्रक्रियेच्या संदर्भात आणि कार्यालयाच्या दृष्टिकोनातून डेटा देखभालीच्या बाबतीत अनुपालनाची माहिती देण्यात आली. पायाभूत सुविधांच्या संदर्भात, डेटा गोळा करताना पुनरावृत्ती टाळण्यासाठी संबंधित क्षेत्रात तपशील (क्षेत्र/उपकरणे/पंखे/दिवे/बेंच) फलकाच्या स्वरूपात लावण्याच्या मौल्यवान सूचना त्यांनी केली.

शिक्षण आणि अध्यापन प्रक्रियेमध्ये पहाडे सरांनी ब्लूम वर्गीकरण आणि प्रभावी शिक्षण याबद्दल माहिती दिली. त्यांनी एका वर्षात ८-१० सामंजस्य करार तयार करण्याचा आग्रह धरला.

दिवसाचे शेवटचे सत्र महाविद्यालयाच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांसोबत होते जिथे त्यांनी सहभागींना डेटा देखभालीचे महत्त्व आणि विविध सरकारी पोर्टलवर वेळेवर सबमिशन करण्याबद्दल जागरूक केले. विलंबित सेवा आणि डेटा गमावणे टाळण्यासाठी सर्व कार्यालयीन प्रक्रियांसाठी SOPs असण्याचा त्यांनी आग्रह धरला.

दिवसभर चालणाऱ्या कार्यशाळेचा समारोप सहभागींकडून सकारात्मक प्रतिसाद आणि कार्यक्रम प्रमुख डॉ. अश्विनी टिळक यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.






**ग्रंथालय विभागातर्फे छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी**

ग्रंथालय विभागातर्फे २६ जून २०२५ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन आयोजित




जरी सुख प्राप्तीसाठी धडपडत असले तरी अपेक्षेप्रमाणे सगळे मिळेलच असे नसते.

करण्यात आले होते. डॉ उर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पती शास्त्र विभाग यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्याचा थोडक्यात आढावा सादर केला.


## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- वि.प्र.मं.चे विधी महाविद्यालयाला बार कौन्सिल ऑफ इंडियाची २०२५-२०२६पर्यंतची मान्यता प्राप्त झाली.
- श्रीमती भावना राकेश डोलकर ह्यांची जोशी-बेडेकर महाविद्यालयातून विधी महाविद्यालयात बदली झाली. त्या दि. ३१ मे २०२५ पासून रूजू झाल्या.
- इलेक्शन लॉ - मॉक पार्लमेंट सत्र १ जून रोजी (ऑनलाईन) घेण्यात आले. विधेयक जनप्रतिनिधित्व (सुधारणा) विधेयक, २०२५ मांडण्यात आले, समर्थन, विरोध झाला आणि शेवटी मंजूर झाले.
- २ जून रोजी नियोजन भवन, ठाणे येथे भारतीय मानवाधिकार संघटना च्या एक दिवसाच्या कार्यक्रमात २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




### जागतिक पर्यावरण दिन - ५ जून


जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी पर्यावरण संवर्धन ब्लॉग लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि पर्यावरण संवर्धन या विषयावर ब्लॉग सादर केले.




- सत्र-I आणि सत्र-III पुनर्मूल्यांकनाचा निकाल ९ जून रोजी जाहीर झाला.
- सत्र VI चा निकाल १२ जून रोजी जाहीर झाला.
- एलएल.एम सत्र-I OSM उपलब्ध पृष्ठांच्या आधारे प्राध्यापकांकडून घेण्यात आले.
- वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर २०२५-२६ च्या प्रॉस्पेक्टस, अनुदानित शुल्क माहिती इत्यादी अद्ययावत करण्यात आले.
- CDC आणि IQAC बैठका अनुक्रमे १३ जून आणि २८ जून रोजी घेण्यात आल्या.
- मुंबई विद्यापीठाने डॉ. अमन पत्रा यांची अनुदानित विभागासाठी नियुक्ती केली व २०२५-२६ प्रवेशासाठी CET नोंदणी ३१ मे रोजी पूर्ण झाली.
- नवीन नियुक्त झालेल्या सहायक प्राध्यापकांच्या वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्रे पगार निर्धारणासाठी सर्व आवश्यक पृष्ठांसह संयुक्त संचालक कार्यालयात सादर करण्यात आली आहेत.

**दिनांक २१ जून : आंतरराष्ट्रीय योग दिवस**

विद्यार्थी सुट्टीवर असल्याने आणि अंतिम वर्षाचे विद्यार्थी इंटर्नशिप करत असल्याने आम्ही ऑनलाईन माध्यम निवडले. सकाळी १० वाजता ऑनलाईन विद्यार्थ्यांनी आनंदाने योगाभ्यासात भाग घेतला आणि योगाचे महत्त्व आणि मूल्य समजावून सांगितले. विविध ध्यान, आसन स्पष्टीकरणासह करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी अपूर्वेश याने योगावरील ३ महिन्याचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला होता. त्याने क्विझ चॅलेंज स्वीकारला होता आणि त्यात तो यशस्वी झाला होता. जागतिक योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे आभार मानले. दुपारी ४ वाजता पहिल्या मजल्यावर डॉ आंबेडकर कॉरिडॉर, कॉलेज बिल्डिंग येथे सर्व कर्मचारी ध्यान, ओंकार, विलोम अनुलोम, आसनांमध्ये सहभागी झाले. ती एक फ्रेश संध्याकाळ होती. श्री सुकराम  बीसेन योग्य प्रशिक्षक आरोग्य सल्लागार यांचे त्यांच्या मार्गदर्शन आणि प्रेरणेबद्दल आम्ही आभारी आहोत.



**अँड ऑन अभ्यासक्रम निवडणूक कायदा (इलेक्शन लॉ):**

अँड ऑन अभ्यासक्रम निवडणूक कायदा (इलेक्शन लॉ) विषयाचा निकाल २८ जून रोजी जाहीर झाला. सदर कोर्स मध्ये २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

- 'नॅक बायनरी सिस्टिम' ह्या विषयावर कार्यशाळा:

दि. २४ जून रोजी वि.प्र.मं चे बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या वतीने  बायनरी नॅक आणि मॅच्युरिटी-आधारित नॅक यंत्रणेवर प्रभुत्व मिळवणे या विषयवार एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार, सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद वाघ, सहाय्यक प्राध्यापक हेतल मिशेरी व ग्रंथपाल शितल सोनावणे ह्यांनी सदर कार्यशाळेत सहभाग घेतला.

- अनुदानित शुल्काच्या सार्वजनिक सूचनेवर FRA साठी PRA अनुपालन नियमानुसार पाठविण्यात आले

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

गुरू हा ज्ञानाचा सागर आहे. शिष्याने विनम्र भाव अंगी बाणवल्याशिवाय या गुरुरूपी सागरातील जल त्याला प्राप्त करता येणार नाही. त्यामुळे शिष्यांनी नेहमी विनम्र असावे. जीवन जगत असताना प्रत्येक वळणावर आपल्याला नव - नवीन माणसे भेटतात. त्यांच्याकडून आपल्याला नवीन काहीतरी शिकायला भेटते. त्यांच्याकडून चांगले काहीतरी शिकायला मिळाले की ते आपले गुरुच होत. आयुष्य जगत असताना आपल्याला गुरूने शिकविलेले सदाचरण कायम आपण लक्षात ठेवावयास हवे आणि पुढच्या पिढीकडे संस्कारातून हस्तांतरित करायला हवे.

ह्याच पौर्णिमेचे औचित्य साधून वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे दिनांक १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

सदर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांनी भारतीय ग्रंथालय क्षेत्रातील जनक आणि गुरू डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. सोबत ग्रंथालय इनचार्ज डॉ. गीताली इंगवले, ग्रंथालय सहाय्यक श्री. चंद्रकांत शिंगाडे

सौ. प्रज्ञा दळवी, सौ. पूजा कुडिया इत्यादी हजर होते. सदर प्रसंगी ग्रंथालय कर्मचाऱ्याकडून सरांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.





कार्यक्रमाला तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी हजर होते. त्यांनी ही आदरणीय प्राचार्य डॉ. नायक सरांना गुलाब पुष्प व चरण स्पर्श करून शुभ आशीर्वाद घेतले. सरांनीही त्यांना चांगला अभ्यास करून उत्तम करियर घडवा असा मौलिक सल्ला दिला.

आषाढ महिन्यातील पौर्णिमेला हा दिवस गुरुपोर्णिमा म्हणून संपन्न केला जातो. गुरुपौर्णिमेला व्यास पोर्णिमा असेही म्हटले जाते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

९ जून २०२५ : डॉ. कांचन अक्षय यांनी लिहिलेला 'ग्रीन ॲफिनिटी: द इन्फ्लुएन्स ऑफ अवेअरनेस, कन्सर्न, फॅजिबिलिटी अँड एक्सटर्नल सपोर्ट' या विषयावरील एक शोध निबंध स्कोपस अनुक्रमित नियतकालिक बिझनेस मॅनेजमेंट अँड इकॉनॉमिक्स इंजिनीअरिंग मध्ये प्रकाशित झाला.

९ जून २०२५ : डॉ. स्मिता जपे यांनी प्राध्यापकांसाठी प्राचीन शिक्षण पद्धती आणि त्याची आजची प्रासंगिकता या विषयावर सीएस, नेहा कारेकर यांचे सत्र आयोजित केले.



१० जून २०२५ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी जनरेटिव्ह एआय: इंट्रोडक्शन अँड ॲप्लिकेशन्स  तसेच १७ जून २०२५ रोजी 'जेन एआय: प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग बेसिक्स' या विषयावरील; आयबीएम द्वारा अधिकृत अभ्यासक्रम पूर्ण केला.

डॉ. स्मिता जपे यांनी १० जून २०२५ रोजी ब्रिम्सच्या प्राध्यापकांसाठी; 'ओ के आर फ्रेमवर्क : उद्दिष्टे आणि प्रमुख निकाल' या विषयावर श्री. महेश देवस्थळे यांचे सत्र आयोजित केले.



११ जून २०२५:  डॉ. नीतिन जोशी यांना एस आय इ एस संस्थे तर्फे मुलाखती घेण्यासाठी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१२ जून २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी, आय एसओ अंतर्गत; प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांसाठी

श्री. तिमिर कुरंभट्टी यांचे एक लेखापरीक्षण प्रशिक्षण सत्र आयोजित केले.



१३ जून २०२५ : ब्रिम्सच्या प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची (SP-TBI) ला भेट.

नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून ब्रिम्सच्या आयआयसी समितीतर्फे, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे असलेल्या सरदार पटेल टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्यूबेटर (SP-TBI) या संस्थेतील प्रक्रिया समजून घेणे, स्टार्टअप सपोर्ट, पायाभूत सुविधांचा अनुभव घेणे आणि संस्था स्तरावर नवीन उपक्रमांना बळकटी देण्यासाठी संधींचा शोध घेणे या उद्देशाने संस्थात्मक भेटीचे आयोजन करण्यात आले.

ब्रिम्सच्या आयआयसी समितीचे प्रमुख म्हणून डॉ. नीतिन जोशी, तसेच ब्रिम्स मधील एकूण २५ प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या अभ्यासपूर्ण भेटीत सहभाग घेतला, एसपी–टीबीआय सुविधांचा दौरा, प्रयास शाळा (प्रोटोटाइपिंग लॅब सुविधा) भेट व एसपी–टीबीआय अभिमुखता (ओरिएंटेशन) आणि परस्परसंवादी प्रश्नोत्तर सत्र असे या भेटीचे प्रमुख घटक होते.



१६ जून २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांचा एक्सप्लोरिंग फॅक्टर्स इन्फ्लुएंसिंग न्यू प्रोडक्ट प्लेसमेंट इन एफएमसीजी फूड रिटेल चॅनल इन इंडिया हा शोधनिबंध स्कोपस अनुक्रमित (इंडेक्स्ड) नियतकालिक – बिझनेस, मॅनेजमेंट अँड इकॉनॉमिक्स इंजिनीअरिंग मध्ये प्रकाशित झाला.


१८ जून २०२५ : डॉ. नीतिन जोशी यांना चेतना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२१ जून २०२५: आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ च्या उत्सवाचा एक भाग म्हणून, दैनंदिन जीवनात सर्वांमध्ये योगसाधनेद्वारे; संयम, ऊर्जा, लवचिकता, आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी ब्रिम्सच्या प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी २३ मे रोजी एक योग सत्र आयोजित केले, तसेच २१ जून रोजी डॉ. अनिल गर्ग यांचे योग सत्र देखील आयोजित केले.





२१ जून २०२५ : डॉ. कांचन अक्षय, डॉ. श्रीपाद बापट आणि प्रा. अदिती पवार यांनी 'एसेन्शियल एचआर मॅनेजमेंट केसेस अँड कन्सेप्ट्स' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात एचआरएमच्या संकल्पना आणि चर्चेसाठी वैचारिक प्रकरणे समाविष्ट आहेत.




२३ जून २०२५ : सहाय्यक प्राध्यापक अदिती दामले-पवार यांनी सिम्बायोसिस सेंटर फॉर वेस्ट रिसोर्स मॅनेजमेंटच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित पोस्टर स्पर्धेत भाग घेतला.


SYMBIOSIS
CENTRE FOR WASTE RESOURCE MANAGEMENT

Certificate of Participation

This is to certify that Ms. Aditi Damle-Pawar of Symbiosis Institute of Management Studies, Pune has successfully participated in the 'Poster Competition' conducted as part of the 10th Foundation Day Celebrations of Symbiosis Centre for Waste Resource Management (SCWRM)

Place : Pune
Date : June 23, 2025

Dr. Manikprabhu Dhanorkar
Head, SCWRM

२४ जून २०२५ : सहाय्यक प्राध्यापक अदिती दामले-पवार यांनी टेलर आणि फ्रान्सिस ग्रुपने आयोजित केलेल्या अभ्यासक्रम नवोन्मेष : २०२५-२६ शैक्षणिक सत्रासाठी अभ्यासक्रम साहित्य तयार करण्याच्या कार्यशाळेत भाग घेतला.

२५ जून २०२५ : डॉ. कांचन यांनी स्कोपस इंडेक्स्ड जर्नलमधील 'द इंटरनॅशनल जर्नल ऑफ इंटरडिसिप्लिनरी ऑर्गनायझेशनल स्टडीज' या शोधनिबंधाचे समीक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

२८ जून २०२५ : एचएसएनसी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या जय हिंद महाविद्यालयाच्या अभ्यास मंडळावर सहाय्यक प्रा. प्रथमेश उमेश तावडे यांना विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

३० जून २०२५ : विवेकानंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) येथे बीएमएस अभ्यासक्रमासाठी प्राध्यापकांच्या मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञ व निवड समिती सदस्य म्हणून सहाय्यक प्रा. प्रथमेश उमेश तावडे यांना आमंत्रित करण्यात आले.

**माजी विद्यार्थ्यांची कामगिरी**

२०२१-२३ तुकडीची एमएमएस-मार्केटिंग शाखेची विद्यार्थिनी निधी जैन हिने गोदरेज अँड बॉयस येथे तीन यशस्वी वर्षेपूर्ण केली. आणि विशेषतः प्रशिक्षण मार्केटिंग टीमच्या क्षेत्रातील तिचे उल्लेखनीय योगदान म्हणून अलीकडेच तिला प्रतिष्ठित 'सर्वोत्तम प्रादेशिक प्रशिक्षक' - पश्चिम विभाग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.